शेतकरी
प्रकाशन
॥५॥

शेतकऱ्याचे धोतर एक बँकेचे, सदरा दुसऱ्या बँकेचा
तर टोपी तिसऱ्याच सोसायटीची.

- श्री. प्रल्हाद कराड पाटील

आम्हाला आमच्या मायबहिणींसाठी
संडास बांधून देता येतील
अशी ताकद तुमच्या अर्थशास्त्रातून काढून द्या.

- श्री. माधवराव खंडेराव मोरे

बिगरशेतीतील वरच्या वर्गाचे काढून
शेतीतील खालच्या वर्गास द्यावे.

- डॉ. वि. म. दांडेकर

गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून
तुम्ही जे प्रयत्न करीत आहात तेवढे बंद करा
म्हणजे गरिबी आपोआप हटेल.

- श्री. शरद जोशी

# शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र

## 'खंडन-मंडन'

शब्दांकन
सुरेशचंद्र म्हात्रे

# शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र
# खंडन-मंडन

श्री. प्रल्हाद कराड पाटील
श्री. माधवराव खंडेराव मोरे
डॉ. वि. म. दांडेकर
श्री. शरद जोशी

शब्दांकन
सुरेशचंद्र म्हात्रे

'शेतकरी संघटना' न्यास
अंगारमळा, आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१० ५०१.

# शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र : खंडन-मंडन
## Shetkari Sanghataneche Arthrhaatta : Khandan-Mandan

प्रकाशक :
**'शेतकरी संघटना' न्यास**
अंगारमळा, आंबेठाण,
ता. खेड, जि. पुणे ४१० ५०१.

**श्री. प्रल्हाद कराड पाटील**
**श्री. माधवराव खंडेराव मोरे**
**डॉ. वि. म. दांडेकर**
**श्री. शरद जोशी**

शब्दांकन :
**सुरेशचंद्र म्हात्रे**

मूल्य : रुपये १००/-

प्रथम प्रकाशन :
मे १९८३
(शेतकरी प्रकाशन, अलिबाग, जि. रायगड)

दुसरे (डिजिटल) प्रकाशन :
७ जून २०२०
('शेतकरी संघटना' न्यास)

टंकलेखन :
सुरेशचंद्र म्हात्रे
(९८२२३००३४८)

अक्षरजुळणी :
अमोघ आर्ट्स,
५७५ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

‘भारता’तील दारिद्र्याचा
वस्तुनिष्ठ विचार करू इच्छिणाऱ्या
‘इंडिया’तील जनसामान्यांना...

– एक दिशा म्हणून

# दुसऱ्या (डिजिटल) प्रकाशनाच्या निमित्ताने

'शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र : खंडनमंडन' या १९८३ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकाची नंतर आवृत्तीच न निघाल्यामुळे शेतकरी संघटनेच्या विचारावर त्याच्या पेरणीच्या हंगामात झालेली महत्त्वाची चर्चा शेतकरी संघटनेच्या पहिल्या पिढीच्या स्मरणापुरतीच मर्यादित राहिली. 'शेतकरी प्रकाशन, अलिबाग'ने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे पुनर्प्रकाशन आणि त्यानंतरच्या काळात शरद जोशी यांच्या लेखांच्या संकलनातून काही पुस्तकांचे प्रकाशन औरंगाबादच्या 'जनशक्ती वाचक चळवळ' या प्रकाशनसंस्थेने शरद जोशींच्या अमृतमहोत्सवी वर्षात म्हणजे २०१० साली केले. पण कसे कोण जाणे, 'शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र : खंडनमंडन' या पुस्तकाचे पुनर्प्रकाशन राहून गेले.

शेतकरी संघटनेच्या कामात नव्याने उतरणाऱ्या तरुणांना पहिल्या पिढीचे कार्यकर्ते या पुस्तकातील चर्चेच्या सुरस कथा जेव्हा ऐकवितात तेव्हा, अर्थातच, त्यांचे कुतूहल जागे होते पण प्रत्यक्ष पुस्तक वाचायला त्यांना मिळत नाही. काही थोडे कार्यकर्ते अंगारमळ्यात येऊन, येथे बसून पुस्तक वाचून आपले कुतूहल शमवून गेले. पण, संदर्भासाठी आपल्याजवळ पुस्तकाची प्रत नसल्याची खंत मनात राहूनच गेली.

आजकाल छापील स्वरूपात पुस्तके प्रकाशित करणे पूर्वीपेक्षा कितीतरी सुकर झाले असले तरी वितरणाच्या दृष्टीने ते अत्यंत अडचणीचे झाले आहे. एक हजार प्रतींची आवृत्ती संपायलाही चारपाच वर्षे लागतात; भांडवल गुंतून रहाते ही बाब आहेच, पण त्या प्रती तोपर्यंत सांभाळत बसणे मोठी अवघड गोष्ट ठरते. नवीन तंत्रज्ञानाने PRINT ON DEMAND ची सोय वापरून पाचपंचवीस प्रती छापून घेता येतात, पण ते फार महाग पडते. म्हणून हा 'डिजिटल'चा पर्याय निवडला आहे. त्यातून संगणक-साक्षर कार्यकर्ते आणि अभ्यासक यांनातरी हे पुस्तक उपलब्ध होऊ शकेल.

याचसाठी हा खटाटोप!

– **सुरेशचंद्र म्हात्रे**

# पहिल्या आवृत्तीचे प्रास्ताविक

'शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र : खंडनमंडन' या पुस्तकाची निर्मिती ही एक आकस्मिक व अनपेक्षित घटनाच आहे. शेतकरी प्रकाशनाच्या संकल्पित यादीत खरे तर हे किंवा अशा प्रकारचे पुस्तक नव्हतेच. पण एका प्रसंगाच्या निमित्ताने ही कल्पना मनात रुजली आणि श्री. शशीकांत बोरावके व सुरेशचंद्र म्हात्रे यांच्यामुळे ती प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने साकार झाली.

शेतकरी प्रकाशनाने शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांची तीन पुस्तके ('शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती', 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' आणि 'भारतीय शेतीची पराधीनता') प्रसिद्ध केली. या पुस्तकांचे प्रकाशन पुण्यासारख्या ठिकाणी समारंभाने व्हावे असे मनात आले. जिच्या हस्ते हा प्रकाशनसमारंभ घडवून आणायचा ती व्यक्ती वर्ण्य विषयातील जाणती असावी अशी एक अपेक्षा मनात धरली होती. श्री. विनय हर्डीकर यांची मदत झाली आणि जी व्यक्ती या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मिळावी असे वाटत होते, पण मिळणार नाही असेही वाटत होते त्याच व्यक्तीचा रुकार मिळाला. ही व्यक्ती म्हणजे डॉ. वि. म. दांडेकर.

डॉ. वि. म. दांडेकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ आहेतच पण निव्वळ सैद्धान्तिक चर्चाचिकित्सेतच आपल्या ज्ञानाची इतिश्री न मानणाऱ्या खऱ्या लोकाभिमुख अशा मोजक्या विद्वानांपैकी ते एक आहेत.

शरद जोशींच्या व त्यांच्या विचारांतील समांतरता अर्थशास्त्रातील जाणत्यांना समजते; वर्तमानपत्री वाचकांना या दोघांच्या विचारांत फार मोठी तफावत आहे असे वाटते. दांडेकर-जोशी हे अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील प्रमुख द्वंद्व. अश्या परिस्थितीत आपल्या पुस्तकांचे प्रकाशन दांडेकरांच्या हस्ते व्हावे यास शरद जोशींनी मान्यता द्यावी आणि दांडेकरांनीही आमंत्रण स्वीकारावे हे दोघांनाही भूषणास्पदच आहे.

डॉ. दांडेकरांच्या रुकारामुळे प्रकाशनाशी संबंधित असलेल्या सर्वांनाच जोर आला. स्वतः शरद जोशी हजर रहाणार होतेच. त्यांचे शेतकरी संघटनेतील एक बिनीचे सहकारी श्री. माधवराव खंडेराव मोरे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारायचे आणि जोशींचे दुसरे महत्त्वाचे सहकारी श्री. प्रल्हादराव कराड पाटील यांनी एक वक्ता म्हणून यायचे कबूल केले.

रविवार, दि. २० फेब्रुवारी १९८३ ही तारीख धरली गेली. पुण्याच्या टिळक

रोडवरच्या टिळक स्मारक मंडळातील प्रेक्षागृह घेतले गेले. वेळ संध्याकाळच्या चारची ठरली. जोशी आणि दांडेकर हे दोन परस्परविरोधी भूमिकांचे म्हटले जाणारे दोन प्रवक्ते एकाच व्यासपीठावर येताहेत ही एक पर्वणीच समजली गेली. आणि जाणत्या प्रेक्षकांनी समारंभाला फार मोठा प्रतिसाद दिला. चार वाजता सुरू झालेली सभा संपायला सव्वाआठ वाजले. श्रोते तल्लीन होऊन ऐकत होते. वक्तेही रंगले होते. सभेनंतर भेटणारा प्रत्येकजण 'अविस्मरणीय कार्यक्रम' असेच म्हणताना आढळला. (सभेनंतर शेतकरी प्रकाशनाची त्या ठिकाणी दीड हजार रुपयांची ग्रंथविक्री झाली!)

चारही वक्ते त्या दिवशी जीव ओतून बोलले. माधवराव मोरे आणि प्रल्हाद कराड पाटील यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा उत्कटपणे मांडल्या. डॉ. दांडेकरांनी त्यांच्या वक्तव्याच्या ओघाला शास्त्राच्या बुद्धिनिष्ठतेचा चौथरा देत आपल्या खास शैलीत आपल्या विचारांची सुडौल मांडणी केली. त्यानंतर शरद जोशींनी डॉ. दांडेकरांच्या भूमिकेचे अवधान ठेवून आपल्या मतांची कौशल्याने उभारणी करीत समारोप केला. अर्थशास्त्रासंबंधी एका किचकट विषयावरील तीन तासांची चर्चा सभागृहानेही एकतानतेने ऐकली हेही अभूतपूर्वच.

ही सभा ऐकत असतानाच वाटले की जे ऐकतो आहोत त्याला ग्रंथरूप द्यायला हवे. आमच्याप्रमाणे अनेकांनाही असेच वाटले होते.

हे आधीच जाणून की काय, श्री. शशीकांत बोरावके व त्यांच्या भावंडांनी प्रस्तुत कार्यक्रम ध्वनिफितींत नोंदून घेतला होता. त्या ऐकल्यावर श्री. म्हात्रे यांचा सिद्ध हात जागा झाला. त्यांनी रात्रीचा दिवस करून सारा कार्यक्रम नकलून काढला.

सर्वच वक्त्यांनी आपले वक्तव्य ग्रंथबद्ध करण्यास अनुमती दिली. डॉ. दांडेकर व श्री. जोशी यांनी तर त्यांच्या वक्तव्याच्या शब्दांकनावर विशेष मेहनत घेऊन हात फिरवले. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन करणे शक्य झाले आहे. अभ्यासकांना याचा उपयोग व्हावा हीच या प्रकाशनामागची इच्छा आहे. श्री. शरद जोशी यांच्या पहिल्या तीन पुस्तकांची पहिली आवृत्ती जवळ जवळ संपलेली आहे. या व शेतकरी प्रकाशनाच्या एका विशिष्ट व्यवसायरहित हेतूने केल्या जाणाऱ्या इतर प्रकाशनांना अशीच दाद मिळावी अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुत प्रकाशनाला ज्यांची मदत झाली त्यांचे उल्लेख संबंधितांनाच रुचणार नाहीत. तरीपण प्रकाशिकेतर्फे त्यांचे ऋण मानायलाच हवेत.

दि. ३० एप्रिल १९८३

**अरविंद वामन कुळकर्णी**
आसरा लॉजशेजारी
अलिबाग (रायगड)

# अनुक्रम

एक : श्री. प्रल्हाद कराड पाटील ..... ९

दोन : श्री. माधवराव खंडेराव मोरे ..... १६

तीन : डॉ. वि. म. दांडेकर, पुणे ..... २५

चार : श्री. शरद जोशी ..... ४३

# एक

## शेतकऱ्याचे धोतर एक बँकेचे, सदरा दुसऱ्या बँकेचा तर टोपी तिसऱ्याच सोसायटीची.

**– श्री. प्रल्हाद कराड पाटील**

शेतकरी संघटनेचा जो एक विषय आहे तो मांडण्यापूर्वी मी तर असे म्हणेन की शेतकऱ्यांचे हे भाग्य आहे की त्यांना शरद जोशींसारखा मनुष्य मिळाला.

गेल्या कित्येक पिढ्यान् पिढ्या शेतकरी जगत आला फक्त कर्जफेडीसाठी. अर्धपोटी राहून बापाचे कर्ज मुलाने फेडायचे, मुलाचे त्याच्या मुलाने, अगदी आजोबाचे त्याच्या पणतवंडाने. अशा प्रकारचे जीवन हे शेतकरी आतापर्यंत जगत आले, असे का?

मी सुरुवातीला म्हणालो की शेतकऱ्यांना शरद जोशींसारखा माणूस मिळाला हे त्यांचे भाग्य आहे त्यामागे एक विशिष्ट भावना आहे; विशिष्ट दृष्टी आहे. या देशाचे स्वातंत्र्य मुळात या देशातील गोरगरीब जनता, कष्टकरी जनता, रात्रंदिवस

राबून झोपडीत रहाणारा जो एक वर्ग आहे या वर्गाला न्याय मिळावा म्हणून मिळवले गेले आहे; कष्टकऱ्यांना, श्रमकऱ्यांना सुख मिळावे म्हणून मिळवले गेले आहे. परंतु दुर्दैवाने, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या गेल्या ३५ वर्षांनंतर आज आपली आर्थिक परिस्थिती काय आहे हे जर लक्षात घेतले तर आपल्या असे लक्षात येईल की गेल्या ३५ वर्षांत या देशातील गरिबांचे, शेतकऱ्यांचे काहीही कल्याण झालेले नाही; त्या नावाने सरकारने गेल्या ३५ वर्षांत ज्या काही योजना म्हणून पुढे आणल्या त्या सर्व दिखावू होत्या असे लक्षात येईल. हे सर्व शरद जोशींनी शेतकऱ्यांना सर्वप्रथम समजावून सांगितले, उघड करून सांगितले म्हणूनच ते मिळाले हे शेतकऱ्यांचे भाग्य आहे.

शरद जोशींनी चाकणमध्ये जो काही कांदा लाल केला त्याच्या प्रेरणेने नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतच्या कांदा मार्केटमध्येही उद्रेक झाला. तिथे माधवराव मोरे होते; अगदी बंदुकीच्या गोळ्यांच्या वर्षावात उभे होते. तिथे शेतकरी आंदोलनाचे दोन बळी पडले. शेतकरी संघटनेच्या आंदोलकांवर जबरदस्त लाठीचार्ज झाला, गोळीबार झाला याचा अर्थ शेतकरी संघटनेचा काही एक वेगळा विचार असला पाहिजे असा संदर्भ साऱ्या महाराष्ट्रभरच नव्हे तर देशभर उभा राहिला. याचे कारण म्हणजे गेल्या ३५ वर्षांत या देशात शेतकऱ्यांसाठी म्हणून जे काही दिले गेले, जे काही विचार मांडले गेले, ज्या काही योजना आखल्या गेल्या ते सर्व फसवे होते असे लक्षात आले. शेतकरी संघटनेच्या विचारांवर त्या वेळी जी टीका करण्यात आली त्याने ही फसवेगिरी अधिक स्पष्ट झाली.

राज्यकर्त्यांनी कधीतरी म्हणायचे – शेती परवडत नाही काय? मग दूध धंदा सुरू करा, जोडधंदा म्हणून. त्यानेही तुमचे भागत नाही? मग तुम्ही कोंबड्या पाळा, कुक्कुटपालन. त्यानेही तुमचे पोट भरत नाही तर डुक्कर सोसायट्या काढा. अत्यंत शरम वाटते सांगायला की या शेतीप्रधान देशातील शेतकऱ्यांना, गांधीजींनी ज्याच्या कल्याणासाठी हे स्वराज्य मिळवले त्या शेतीव्यावसायिकांना या देशातील राज्यकर्त्यांनी सांगावे की शेतीत पोट भरत नसेल तर दूधउत्पादन करा, कोंबड्या पाळा, डुक्कर सोसायट्या काढा; पण घामाच्या दामाबाबत बोललात तर लाठ्या खा, गोळ्या खा.

वर्तमानपत्रांतून शेतकरी संघटनेच्या, शरद जोशींच्या विचारांवर खूप हल्ले झाले. कुणी श्रममूल्याची चर्चा केली, कुणी म्हणाले शेतीमालाचे भाव वाढले तर बाजारभाव वाढून शहरांतील माणसांचे काय होईल? कुणी म्हणाले मागणी पुरवठा! वेगवेगळ्या

तत्त्वांची चर्चा वर्तमानपत्रांतून सुरू झाली. ती वाचत असताना अत्यंत दु:ख झाले, यासाठी की कुणीही आपला हा विचार समजावून घेतलेला नाही.

आज आपले सुदैव आहे की आपल्याबरोबर इथे बसलेले डॉ. दांडेकर यांच्या मनातसुद्धा शेतकऱ्यांविषयी कणव आहे. ज्या ज्या ठिकाणी ते गेले तिथे त्यांनी ती व्यक्त केली आहे. पण ज्या वेळी वर्तमानपत्रातून 'कांगावखोर शरद जोशी' असे जे काही उल्लेख झाले त्यामुळे आमच्या मनाला खंत वाटू लागली. पण कदाचित हा त्यांचा गैरसमज किंवा कुठेतरी मनातला गोंधळ असावा असा मनात विचार आला. कारण शेवटी आमच्या डोळ्यासमोर आमच्या घरातली बाई, जी रात्रंदिवस काबाडकष्ट करते तिचे, जी मुलेबाळे राबतात त्यांचे दारिद्र्य उभे असते. आम्हाला दिलेल्या फसव्या योजनांची फळे कुठे दिसत नाहीत. अगदी फटफटीवाल्या शेतकऱ्याच्या घरात तुम्ही चुलीपर्यंत गेलात तर त्याच्या बायकोच्या अंगावर तीन दांडाचे लुगडे आणि पोरे उघडीच फिरतात असे दिसेल. आणि त्याचे धोतर एका बँकेच्या ताब्यात, सदरा दुसऱ्या बँकेच्या ताब्यात तर टोपी सोसायटीच्या ताब्यात असे कळेल.

अशी एकूणात शेतकऱ्याची परिस्थिती आहे. असे असताना आम्ही जेव्हा आर्थिक विचार करतो, श्रममूल्याचा विचार करतो तेव्हा आम्हाला समजू लागते की या परिस्थितीला या देशातल्या शेतकऱ्याचे फार मोठ्या प्रमाणावर जे शोषण चालले आहे तेच कारणीभूत आहे.

एक गोष्ट मात्र मी प्रामुख्याने हात जोडून सांगू इच्छितो की शहराविरुद्ध शेतकरी नाही, शहराविरुद्ध खेडी नाहीत. तुम्हा माणसांना महाग खाऊ घालावे अश्या दानतीचा शेतकरी नाही. तेव्हा मनातून गैरसमज काढून टाका. 'शेतकरी सुखी तर जग सुखी' हा सिद्धान्त ध्यानात ठेवा. १९४६ साली पन्नास ते साठ रुपयांत एक तोळा सोने मिळत होते आणि तितक्याच रुपयांत एक पोतेभर धान्य मिळत होते. आज सोन्याचा भाव काय आहे आणि धान्याचा भाव काय आहे याचा विचार करा. हे सोन्याचे उदाहरण मुद्दाम दिले कारण जगाचे अर्थकारण सुवर्णाच्या माध्यमातून चालते. शेतीमालाचे जे जे उत्पादन झाले त्याच्या किंमती स्थिर ठेवण्याचे प्रयत्न झाले पण पक्क्या मालावर कुठेही निर्बंध राहिले नाहीत. आणि तीच महागाई तुम्हा शहरवासियांना जाळते आहे.

१९४६ साली दीडदोन रुपये घनफुटाने मिळणारे लाकूड आज २५० रुपये घनफूट आहे. त्या काळात शेदीडशे रुपयांत मिळणाऱ्या बैलगाडीला आज साडेचार

हजार रुपये पडतात. दोनतीन रुपयांचे सिमेंट, अंतुल्यांच्या काळातील १७० रुपयांचे दर सोडले तरी, आज गोणीला ऐंशीनव्वद रुपयांच्या कमी किंमतीला मिळत नाही. शेतीमालाच्या उत्पादनासाठी लागणारी जी लागवड (निविष्ठा) आहे त्यांच्या किंमती या अश्या वाढत आहेत. कुणी म्हणेल की, सिमेंट, लाकूड, लोखंड यांचा शेतीमालाच्या उत्पादनाशी काही संबंध आहे का? आहे ना! लाकूड महागले म्हणून बैलगाडी महागते. अडीच रुपयांना मिळणारे बैलगाडीचे जू आज ऐंशी रुपयांखाली मिळत नाही. बघा किती पटींनी वाढली! देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या ३५ वर्षांत अन्नधान्याच्या किंमती कुठेतरी दोनतीन पटच वाढल्या. गेली चारपाच वर्षे कापसाच्या किंमती एका ठरावीक पातळीपर्यंत सरकारने दाबून ठेवल्या परंतु चार वर्षांपूर्वी 'टू बाय टू'चा ब्लाउज पीस – रुबी कंपनीचा – जो साडेचार रुपयांना मिळत होता त्याची किंमत आज आहे एकवीस रुपये. पक्क्या मालाच्या किंमतीत किती पटीने वाढ झाली पहा!

हे तुम्हाला कसं दिसत नाही? शेतकऱ्यांनी आज शेती करावीतरी कशी? व्याजाचे दर, अगदी सोसायट्यांपासून बँकांपर्यंत, भरमसाट वाढले आहेत. त्याचा कितीतरी बोजा या शेतीव्यवसायावर पडला आहे. काही माणसं वर्तमानपत्रांतून लिहितात की अरे, शेतकऱ्यांना काही टॅक्सच नाही; त्यांनी इन्कम टॅक्स् भरला पाहिजे. माझा असा दावा आहे की देशातील सर्व टॅक्स् शेतकरीच भरतो. परवा मुख्यमंत्र्यांच्या भेटीत त्यांना म्हटले की, दादा, टाटाच्या मर्सिडिज गाडीच्या चेसीची किंमत अडीच लाख रुपये झाली, डिझेलची किंमत वाढली, लोखंडाची किंमत वाढली की मुंबईहून पुण्याला किंवा पुण्याहून चाकणला शेणखत नेण्यासाठी ट्रकला पूर्वी ५० रुपये पडत असतील तर आता ४०० रुपये भाडे भरावे लागते. ही जी वाढ होते ती शेतकऱ्यालाच भरावी लागते. शेतकऱ्याला शेती पिकवावीच लागते, पण कशी पिकवावी? हे प्रत्येक बाबतीत घडते आहे. सर्व प्रकारचे टॅक्सेशन हे शेतकऱ्याच्या माथीच बसते, कारण व्यापारी नेहमी मार्जिनल धंदाच करतात. ठीकच आहे. 'टू बाय टू'चा पीस त्याला १८ रुपयाला मिळत असेल तर तो २१ रुपयाला विकतो.

मग शेतीमालाच्या किंमतीचे काय? गेली चार वर्षे ज्वारीच्या किंमती त्याच, गव्हाच्या किंमती त्याच, कापसाच्या किंमती त्याच, उसाच्या किंमतीही त्याच? मी सोळासतरा वर्षे एका साखर कारखान्याच्या संचालकाचे काम करतो. फार टीका होते बागायतदारांवर, साखर कारखानदारीवर. काय आहे साखर कारखानदारांची परिस्थिती,

समाजावून घेतलीत? शेतकऱ्यांचे साखर कारखाने झाले. शेतकरी आता कारखानदार झाला, परंतु त्याच्या नशिबाचा लिलाव गेलेला नाही. ६५ टक्के साखर सरकारने गेल्या वर्षी २ रुपये ८१ पैसे किलोने घेतली आणि यंदा २ रुपये ८३ पैशांनी, बाकीची लिलावात विकायची. हे आमच्याच नशिबी का? त्यातून पुन्हा साखरेची – पक्क्या मालाची किंमत अगोदर ठरते. मग अडीच हजार रुपयांचा कुणी मॅनेजिंग डायरेक्टर, सेक्रेटरी, ऑफिस सुपरिंटेंडेंट, तिथला चीफ इंजिनिअर, अकाउंटंट या सर्वांची पगारदारी आणि सगळी मॅन्युफॅक्चरिंग कॉस्ट वजा जाता उरले तर ऊसउत्पादक शेतकऱ्याला. म्हणजे कच्च्या मालाची किंमत शेवटी? हे आमच्याच नशिबी का? दुसऱ्या इंडस्ट्रीच्या नशिबी आहे का? भिलईमधून निघणारे लोखंड, त्याची किंमत अगोदर होते. ट्रॅक्टर बनल्यावर नफा आकारून मग त्याची किंमत ठरवली जाते. दुर्दैव फक्त शेतकऱ्यांचेच आहे की त्यांच्या कच्च्या मालाची किंमत अगोदर ठरत नाही, पक्क्या मालानंतर ठरते. उदाहरणार्थ, आधी साखरेची किंमत ठरते, त्या आधाराने मग उसाची किंमत ठरवली जाते. हे असे का?

फार शहाणपणाने लोक आम्हाला बोलतात की, का हो, तुम्ही माल का विकता? परवडत नाही तर विकूच नका. शेती परवडत नाही तर धंदा करूच नका. काय मनात येईल ते म्हणतात. मग आम्ही काय समुद्रात बुड्या मारायच्या? आंधळा भीक का मागतो? 'स्ट्रगल फॉर एक्झिस्टन्स'साठी, ओबेराय शेरेटन बांधण्यासाठी नाही.

शेतीव्यवसाय करीत असताना ज्या महागाईला सामोरे जावे लागते ती ज्या पटींनी वाढली आहे त्या पटीला काही माप राहिलेले नाही आणि आमच्या मालाचे भाव मात्र किरकोळीने वाढत आहेत. अश्या परिस्थितीत शेतकरी दुसरे काय करू शकतो? मी तर असे म्हणेन – तुम्ही माणसे जर असेच म्हणू लागली की पोटासाठी मिळणारे कमीत कमी किंमतीत मिळवायचे आणि त्यासाठी मोर्चे काढायचे, सत्याग्रह करायचे, घेराव घालायचे आणि राहिलेल्यात चैन करायची; तुमची जर अशीच मनोवृत्ती रहाणार असेल की १ रुपया ६० पैसे किलोचा गहू १० पैशांनी वाढला तर तुम्हाला महागाई वाटावी, उलट चैनशौक, मौजमजा, वासनांचा धिंगाणा इत्यादिसाठी लाखोंची उधळण तुम्हाला गैर वाटत नसेल तर – आपण एका भयानक असंतोषाला आमंत्रण देत आहात.

एकीकडे नाटके, सिनेमा, वासनांचा धिंगाणा अश्या गोष्टींवर आपण लाखो रुपयांची उधळण करीत आहात तर तिकडे जो शेतकरी पोटासाठी 'घामाचे दाम

द्या, भीक नको' हे कलम घेऊन उभा रहातो त्याच्यावर हेलिकॉप्टरमधून गोळ्या घातल्या जातात. हे आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. १९८० साली अडीच लाख माणसे रस्त्यावर बसली होती. खेरवाडीला अकारण गोळीबार झाला, माणसे हात बांधून बसलेली असताना. त्या वेळची माझ्यावर कलम ३०२ची केस आहे; जोशीसाहेब आणि माधवरावांवरही आहे – खुनी म्हणून.

पण पोलीसपंचनामा पहा कसा होता तो. खेरवाडीला गोळीबार झाला त्या वेळी जोशीसाहेब आणि माधवराव जेलमध्ये होते, मी खुला होतो, त्या अडीच लाख शेतकऱ्यांवर नियंत्रण ठेवत होतो. आणि त्या पंचनाम्यात पोलिसांनीच लिहिले आहे, कुणीतरी पुढारी (म्हणजे मी –) आला आणि त्याने आंदोलकांना सांगितले की हात बाधून बसा. माणसे हात बांधून बसली. त्या हात बांधून बसलेल्या माणसांवर 'हिंसाचाराला वळण लागले' असे म्हणून लाठीचार्ज आणि गोळीबार करून माणसे मारली. असे का? काय मागत होती ही माणसे? फक्त घामाचे दाम!

१९८१ साली टेहऱ्याला जो गोळीबार झाला तिथे १८ हजार माणसे येऊन बसली होती. रात्री पंधरा हजार माणसे नदीच्या पात्रात बसून होती कारण शरद जोशींचा आदेश होता की सकाळी सहाशिवाय रस्ता रोकायचा नाही. रात्री तीन वाजता घराघरातून, देवळादेवळातून, शाळेमधून, कुठे रस्त्याच्या कडेला माणसे झोपली होती त्यांच्यावर लाठीचार्ज आणि गोळीबार केला. सकाळी सहाला ऑल इंडिया रेडिओच्या बातम्यांत जाहीर झाले की गोळीबार झाला आणि माणसे मेली. आम्ही चौघेही (शरद जोशी, माधवराव मोरे, माधवराव बोरस्ते आणि प्रल्हाद कराड पाटील) धुळ्याच्या जेलमध्ये एकमेकांचे चेहरे पहात बसलो होतो. बाहेर काय होणार अशी चिंता लागून राहिली होती.

जी माणसे या देशातीलच नव्हे तर जगातील माणसांना जगविण्याची साधने आहेत ती 'आमच्या घामाचे दाम द्या' अशी मागणी घेऊन रस्त्यावर आली तर त्यांच्यावर गोळीबार होतो. १९८० आणि १९८१ साली हे असेच घडले आहे.

नगर जिल्ह्यात १८ साखर कारखाने आहेत. त्यांच्याकडे शेतकऱ्यांची ९० कोटी रुपयांची थकबाकी आहे. हे असे का होते? अर्थशास्त्रज्ञ श्रममूल्याची चर्चा करतात. पागे समितीचा रिपोर्ट आला आहे त्यात शेतमजुराला पाच ते सात रुपये द्यावेत असे कुठेतरी आहे. आज प्रत्यक्षात शेतमजुराला दहा ते पंधरा रुपये मिळतात. आमचे श्रममूल्य एवढे कमी आहे का? एखादा बँकेतला शिपाई किंवा एल. आय. सी. मधला शिपाई महिना हजारबाराशे रुपये पगार घेतो तो काय काम करतो? याच्या

टेबलावरचे कागदांचे बंडल उचलून त्याच्या टेबलावर हापटायचे, याच्या मढ्यावरून त्याच्या मढ्यावर ठेवायचे. पहा काय स्किल आहे, बाराशे रुपयांचे! आणि रिकामा वेळ मिळाला तर तीन चहा सांगून येणे..... आणि आम्ही? बायको, आई, मुले, म्हातारी माणसे उघड्या अंगांनी, कवडीची मजुरी न धरता उन्हापावसात राब राब राबतो. मग कुठेतरी 'कॉस्टिंग' करताना पाच ते सात रुपये रोज धरायचा म्हणे! यात अर्थशास्त्राचा किंवा श्रममूल्याचा कोणता नियम आहे मला समजलेले नाही. कुठल्या प्रकारची मजुरी काय असावी? महागाई कितीतरी पटींनी वाढली आहे. ही सगळी महागाई सोसून शेतकरी उत्पादन काढतो आणि त्याच्या श्रमाचे मूल्य फक्त दोनचार रुपयेच असावे? आमच्या लेकीबहिणी लग्न होऊन सासरी गेल्या की सरणावर जाईपर्यंत त्यांना सुख पहायला मिळत नाही, तिथे कुठले टिळक मंदिर आणि कसली नाटके आणि सिनेमे! काही सुख नाही. पहाटे उठून बाहेर जावे, दिवसभर राब राब राबावे, संध्याकाळी घरी येताना रानात पडलेल्या शेणाच्या गोवऱ्या गोळा करून आणाव्यात, लाकडेलुकडे आणावीत, चुलीत घालावीत; डोळ्यात धूर जातो आहे तरीही तीन तुकडे थापावेत, मुलांना, मालकाला खावू घालावेत, उरले तर खावे नाही तर उपाशीच झोपावे. ही स्थिती आज देशातील ५२ कोटी लोकांची होऊन बसलेली आहे.

शहरांविरुद्ध खेडी असे नाही. शेतकरी तुमच्या विरुद्ध नाही. पण जर याच पद्धतीने शेतीव्यवसायाकडे आपण मंडळी बघत राहिलात, विचारवंत बघत राहिले, विद्याप्रचुर माणसे बघत राहिली, असेच कोरडे ओढत राहिली तर या देशातील माणसे एका भयानक असंतोषाच्या ज्वालामुखीवर बसलेली आहेत असेच म्हणावे लागेल.

आज सुपातले जात्यातल्यांना हसत आहेत. पण जात्यातले भरडून झाल्यानंतर सुपातल्यांचीही तीच गत होते. पण काही महाभाग भामटे असतात. ते जात्याला मधे एक 'खुटा' असतो त्याच्या पाळीला चिकटून बसतात आणि बाकीच्यांना हसत असतात. पण हे जेव्हा त्या दळणाऱ्या बाईच्या लक्षात येते तेव्हा ती तळी वर उचलून धरते आणि लहान 'कुच्च्या'ने ते पाळीतले दाणे जात्यात घालते. मग त्यांचाही तोच निकाल लागल्याशिवाय रहात नाही. लक्षात ठेवा, शेतकऱ्यांची तळी शरद जोशींनी उचलून धरली आहे आणि शेतकऱ्यांची तरणीबांड पोरे, म्हातारी-कोतारी, लहान पोरेबाळे – सगळी हा 'कुच्चा' घेऊन उभी राहिलीत. खुट्याला चिकटलेली जोपर्यंत सुटणार नाहीत तोपर्यंत शेतकरी संघटनेचा विचार कदापि मागे येणार नाही.

■

## दोन

**आम्हाला आमच्या मायबहिणींसाठी संडास बांधून देता येतील अशी ताकद तुमच्या अर्थशास्त्रातून काढून द्या.**

**– श्री. माधवराव खंडेराव मोरे**

टिळक स्मारक मंदिर हे पुणेकरांच्या मनात विश्रांतीकरिता, विरंगुळ्याकरिता बांधलेले आहे. पण आजची सभा विश्रांतीची आणि विरंगुळ्यात ऐकण्याची नाही. आजच्या सभेचे मोल, कृपा करून, कमी समजू नका.

आम्ही आज चार वर्षे संपूर्ण महाराष्ट्रभर या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरत आहोत. आम्ही जिथे जिथे जातो तिथे शेतकरी संघटनेच्या सभेला येणारी माणसे येताना त्यांचा विचार, भावनांची ठेवण, त्यांचा जो एक दृष्टिकोन असतो तो मनात ठेवून येतात. पण ते एकदा सभेला येऊन बसले आणि त्यांनी शेतकरी संघटनेचे विचार ऐकले की ते शेतकरी संघटनेचे नक्कीच होऊन जातात. त्यांतील प्रत्येक माणूस परत जाताना तो आलेला असतो तसा रहात नाही. त्याच्या अंतःकरणातले

विचार अजिबात बदललेले असतात. अशा विचारांवर चर्चा ज्या सभेत होणार आहे अश्या सभेला तुम्ही लोक आला आहात.

गेली चार वर्षे शेतकरी संघटनेच्या विचारांनी शेतकऱ्यांच्यात जागृती निर्माण करण्याचे काम चालले आहे, समुद्रमंथनाचे काम चालले आहे ते कशासाठी? माझी शेतीच्या धंद्यात ३४ वर्षे गेलीत. कुठल्याही राजकीय पक्षाचा चार आणे सभासद मी झालो नाही. इमानेइतबारे आपली शेती करावी असे वाटायचे. शेती करताना यंदा नाही साधले तर पुढच्या वर्षी साधेल अशी आशा असायची. कष्ट करताना कधी रात्र नाही पाहिली, दिवस नाही पाहिला; उन्हाळा, पावसाळा, हिवाळा काही पाहिले नाही; वेळेवर कधी भाकरी नाही खाल्ली. सारखा एकच ध्यास – कधीतरी भाग्य उजळेल. पण प्रत्येक वर्षी काही ना काही विघ्न यायचेच. तरीही मनाची समजूत घालायची – यंदा नाही साधले, पुढच्या वर्षी साधेल; पुढच्या वर्षी नाही साधले, त्याच्या पुढच्या वर्षी साधेल. पण कधी थंडी पडली, कधी गारा आल्या, कधी मंदी आली, कधी आणखी काही झाले; साधले मात्र काही नाही. शरद जोशींची गाठ पडली तोपर्यंत ते कष्ट, ते हाल, ते दारिद्र्य, त्या अडचणी, तो कर्जाचा हिमालय – सगळ्याला मोठ्या आनंदाने तोंड देत होतो. कष्ट करीत रहायचे, सुख कधी ना कधी भेटेल ही आशा मात्र पक्की घर करून बसलेली होती. आणि त्या धाग्यावर मी लढाई लढत होतो.

ज्या वेळी शरद जोशी मला भेटले आणि त्यांनी सांगितले की, माधव, हे असं नाही. तुला जे वाटतंय की आज नाही उद्या तुझी परिस्थिती सुधारेल ते खोटं आहे. तुझी परिस्थिती कधीच सुधरणार नाही. तुम्हा शेतकऱ्यांना या कर्जाच्या डोंगराखाली दारिद्र्यात खचतच ठेवायचं हे सरकारचं धोरण आहे. तेव्हा मी म्हटले, या शरद जोशीचं काय डोकंबिकं फिरलं की काय? हा असं कसं बोलतो की तुमच्या शेतीमालाला भाव द्यायचा नाही हे सरकारचं धोरण आहे?

मला वेड लागायची पाळी आली. मी काहीच बोललो नाही. माझ्या डोळ्यासमोर मी आणि माझ्या कोट्यवधी भावांनी आयुष्यभर उपसलेले कष्ट आणि भोगलेले हाल उभे राहिले. तरीही शरद जोशींच्या म्हणण्यावर माझा विश्वास बसत नव्हता. पण त्यांनी केंद्र सरकारच्या एका कमिटीचा अहवाल दाखवला. त्यात म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला त्याच्या उत्पादनखर्चावर आधारित भाव द्यायचे झाले तर त्या शेतकऱ्याची आई, बायको, मुलगी, त्याच्या घरातील जे जे नातेवाईक शेतीवर काम करतात, जे शेतीवर रात्रंदिवस बारा महिने कष्ट करतात त्यांची मजुरीसुद्धा त्यात

धरावी लागेल. आणि ती मजुरी जर त्यात धरायची ठरली तर शेतीमालाचे भाव इतके वाढवून द्यावे लागतील की असे करणे अव्यवहार्य आहे.

हे पाहिल्यावर मात्र मी मलाच म्हणालो, माधव, असा मोडीच्या भावात मरू नकोस. मग मी ठरवले की आपली तर फसवणूक झालीच आहे पण आपण सबंध महाराष्ट्रभर फिरून आपल्या सर्व भावांना जागे करू.

मला माहीत आहे की हे आम्हाला तुडवून मारणार आहेत. पण, मरताना निदान एक भावना राहील की आम्ही मरतो आहोत हे काही आमचे दुर्दैव नाही, हा निसर्गाचा कोप नाही तर हे नीच कारस्थान आहे. आम्ही शेतकरी आयुष्यभर टाचा घासून आज मरून राहिलो आहोत, आमचे बापजादेही असेच गेले याला कारण हे हरामखोर राज्यकर्ते आणि हे नमकहराम अर्थशास्त्रज्ञ आहेत जे केंद्र सरकारला त्यांच्या कमिट्यांवर बसून सल्ले देतात.

पण परमेश्वराला दया आली आणि आम्हा शेतकऱ्यांना शरद जोशी भेटले. त्या वेळेपासून मी डोक्यात राख घालून हे एकच व्रत घेतले आहे. मला तर काही काही वेळा वाटते की परमेश्वर नसलाच पाहिजे आणि असलाच तर फार दुष्ट असला पाहिजे. ३५ वर्षे या महाराष्ट्रावर राज्य केले कुणी? ९५ टक्के शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहेत. त्यांचे बापजादे शेतकरी आहेत. यांनी इतकी इलेक्शने लढवली, आमच्याकडून पेट्या भरभरून मते घेतली; जातीच्या नावावर, पातीच्या नावावर; शेतकऱ्यांचे राज्य आहे, अमुक आहे, तमुक आहे अश्या हजारो लाखो थापा मारून मते घेतली. आम्ही त्यांना विचारतो, तुम्ही इतकं सगळं बोललात पण ही एकच गोष्ट तेवढी गेल्या ३५ वर्षांत का नाही कुणी बोलला तुमच्यापैकी? या हरामखोरांजवळ या प्रश्नाचे उत्तर नाही.

शरद जोशी हा माणूस भेटला नसता तर? काय झाले असते? आम्ही असेच टाचा घाशीत मेलो असतो!

तुम्ही पुणेकर मंडळी, तुमच्याबद्दल मनात कुठेही वैराची द्वेषाची भावना नाही हे परमेश्वराला स्मरून सांगतो. पण अंतःकरणाची आग होते. तुमचं रहाणीमान आम्ही बघतो; जो साहेब म्हणतो की यांच्या बायकामुलांची मजुरी देऊ नका त्या दिल्लीवाल्याचंही बघतो. यांच्या घरी एक दिवस जर धुणेभांडीवाली आली नाही, स्वयंपाकीण आली नाही तर या साहेबाच्या, जो म्हणतो की शेतकऱ्यांच्या बायकापोरांची मजुरी देऊ नका, त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. हा चिडून ऑफिसात बोलतो, अहो, आज आमच्या मिसेसला फार त्रास झाला हो. आज

आमची धुणेभांडीवाली आलीच नाही. तिला काही लाज नाही, शरम नाही. त्यामुळे आमच्या मिसेसला फार त्रास झाला. यांच्या मिसेसला त्रास झाला म्हणजे काय झाले? तीन पोळ्या लाटायला लागल्या आणि याची अंडरपँट धुवावी लागली फक्त! आणि तीही किती? फक्त एक दिवस. आणि हा हरामखोर साहेब सांगतो, शेतकऱ्याची बायकामुलं शेतावर राबतात त्यांची मजुरीसुद्धा धरू नका. जगात या पराकोटीचा अन्याय नसेल.

काय जिणे जगतोय आम्ही शेतकरी? मला तर या चार वर्षांत असे वाटायला लागले आहे की जे दुःख पहायलासुद्धा मोठी ताकद लागते, ते सहन कसे केले असेल? पण त्याचा परिणाम असा झालेला आहे, मी गावोगाव हिंडत असताना पहातो की या दुःखाने शेतकऱ्याचा मेंदू पार बधीर होऊन गेला आहे. आम्हाला दुःख कशाला म्हणायचे हेच कळेनासे झाले आहे. या दुःखाची इतकी सवय झाली आहे की दुःख हे दुःख वाटतच नाही. ज्या शेतकऱ्यांची चाळीसचाळीस, पन्नासपन्नास वर्षे शेतीत गेली आहेत आणि जे आता पन्नाशीत आणि साठीत आहेत त्यांना कशाचाच राग येत नाही. गावात कुणी दोन रुपयांचा किराणा उधार दिला नाही, कापडवाल्याने पाच रुपयाचे कापड उधार दिले नाही किंवा खताच्या एखाद्या गोणीसाठी सोसायटीच्या सेक्रेटरीने 'पायरी उतर खाली' म्हटले तर त्याचे त्याला काही वाटत नाही. एवढेच काय, याच्या घरी याच्या बायकोच्या ढुंगणावर तीन दांडांचे लुगडे आहे याचे त्याला काही वाटत नाही, त्याच्याही पलीकडे वाईटातली वाईट गोष्ट म्हणजे, स्वातंत्र्य मिळून ३५ वर्षे झाली तरी अजून आमच्या आयाबहिणींना उघड्याने रस्त्यावर जनावरासारखे परसाकडे बसावे लागते. त्यांना साधा संडासही आम्ही बांधून देऊ शकलो नाही की आंघोळीला निवारा कारून देऊ शकलो नाही. असे दोन पायांच्या जनावरांचे जिणे या राज्यकर्त्यांनी आम्हाला जगायला लावले आहे. आजच्या जगात दहा हजारांपैकी नऊ हजार नऊशे नव्व्याण्णव शेतकऱ्यांच्या बाया रस्त्यावर परसाकडे बसणाऱ्या असा हा आपलाच देश असेल. जगात दुसरा असा देश सापडणार नाही कुठे! दांडेकरांनी दुसरे काही करू नये, फक्त आमच्या मायबहिणींसाठी संडास बांधून देता येतील अशी ताकद त्यांच्या अर्थशास्त्रातून आम्हाला काढून द्यावी. आम्ही आमच्या कातड्याचे जोडे तुम्हाला शिवू. आम्ही फार काही मागत नाही. फक्त त्या मायमाऊलींना परसाकडेतरी निवाऱ्याला बसू द्या.

हे लोक इंदिरा गांधीचा जयजयकार करतात. पण आम्ही महाराष्ट्रभर सभांतून या बाईला सांगितले आहे की, आतापर्यंत अनेक अतिरथीमहारथींना – अगदी

यशवंतराव चव्हाणांपासून जगजीवनराम, मोरारजी कोण असतील त्यांना धुळीस मिळविलेस. पण याद राख, आम्ही आता जागे झालो आहोत. तू आणि तुझ्या बापाने आम्हाला ३५ वर्षे फसवले, तू सगळ्यांशी भांडलीस, आमच्याशी भांडू नकोस. तुझा सत्यानाश झाल्याशिवाय रहाणार नाही. आणि याचे प्रत्यंतर आंध्र आणि कर्नाटकच्या शेतकऱ्यांनी दिले आहे. आणि, महाराष्ट्रातला शेतकरीसुद्धा या फसवणाऱ्या राजकारण्यांना आणि अर्थशास्त्रज्ञांना तुडवल्याशिवाय रहाणार नाही.

मी अशा ठिकाणातला शेतकरी आहे की माझ्या तालुक्याला पाच धरणांचे पाणी मिळते. सबंध हिंदुस्थानात असा दुसरा तालुका नाही की ज्याला पाच धरणांचे पाणी मिळते. माझ्या तालुक्यात १०० टक्के इलेक्ट्रिफिकेशन झाले आहे. तालुक्यातून हायवे जातो, रेल्वे जाते, चार तासांवर बंदर आहे. हवामान अनुकूल आहे, सगळी पिके होतात. एवढा उत्कृष्ट तालुका असूनसुद्धा गेल्या ३५ वर्षांत माझ्या गावच्या सोसायटीत असा एकही शेतकरी झाला नाही की मरताना सोसायटीच्या सेक्रेटरीला बोलावले, सोसायटीची बाकी भरली आणि मग मेला; सोसायटी चुकती करून मेला अशी एकही केस नाही. दांडेकरसाहेब, बसवा कोणत्या अर्थशास्त्रात बसते ते! ३५ वर्षांत आमचा हा रोग दिसलाच नाही कुणाला?

जसे एखाद्या माणसाला कॅन्सर झाला आहे, त्याला टाटा मेमोरियलला घेऊन जा असे डॉक्टरने सांगितले की आपण त्याला मुंबईला घेऊन जातो. आणि, तिथल्या डॉक्टरने त्याला ॲडमिट करून घेतले आणि त्याचे नाव तिथल्या डायरीत नोंदवले गेले की त्या माणसाच्या मरणाची वाट पहाण्यापलीकडे आपण काही करू शकत नाही; तो कितीही तरूण असो, त्याच्या आईवडिलांना, बायकोपोरांना त्याची कितीही जरूरी असो, आपले काही चालत नाही. कारण त्या रोगावर अजून औषधच निघालेले नाही. तसेच, आमच्या मायबाप सरकारने या गावोगाव ज्या सोसायट्या काढून ठेवल्या आहेत ना, त्या आम्हा शेतकऱ्यांच्या 'टाटा मेमोरियल हॉस्पिटल' आहेत. एकदा त्या सोसायटीच्या डायरीत नाव लिहिले गेले की तो मेला. माझा बाप सोसायटीच्या कर्जात मेला आणि मीसुद्धा त्याच्यातच मरणार. लाखालाखांच्या सभेतून आम्ही आवाहन करतो की, तुम्ही वेगवेगळ्या गावांतून आलात. सगळ्यामधून एकतरी उदाहरण असे सांगा, एकातरी शेतकऱ्याचे नाव सांगा की ज्याने सोसायटी पूर्णपणे चुकती केली आणि तो मेला. सगळीकडे भयाण शांतता पसरते, सगळे अवाक होऊन जातात.

आजवर ही बाजू त्यांना कुणी कधी समजावूनच सांगितलेली नाही. तो सभेहून

जाऊ लागतो तेव्हा स्वतःचेच प्रेत चितेवर चढवून आणि ढणाणा पेटवून निघाल्यासारखा उदासपणे, जड पावलांनी आपल्या घरी जातो.

इतक्या भयाण परिस्थितीत आम्ही जगत असताना पुण्यातली मंडळी आमच्याबद्दल तिरस्काराने बोलायला लागली की अंतःकरण भळभळा वाहायला लागते. निदान खरेतरी बोला! तुम्ही बोलता, पण दुसऱ्या बाजूला किती माणसे जिवंत मरण रोज जगून राहिलीत याचा कधी विचार केला आहे का?

आम्ही शेतकऱ्यांना सांगतो की ही लढाई तुम्हाला लढावीच लागणार आहे. चार वर्षांपूर्वी जेव्हा मी शरद जोशींबरोबर फिरायला लागलो त्या वेळेला मला असे वाटले होते की या मुद्द्यावर वाद होण्याचे कारण काय! आपले सगळे राज्यकर्ते, सगळी बाकीची आपली माणसे या गोष्टीला कबूल होतील. पण प्रत्यक्षात जेव्हा रिंगणात उतरलो, आम्ही शेतकरी उठाव करू लागलो तेव्हा लाठीमार आणि गोळीबार करून राज्यकर्त्यांनी आम्हाला चिरडून टाकले. आणि हे राज्यकर्ते बोलायला लागले, साल्या हो, तुम्हाला ढुंगण धुवायची अक्कल नव्हती आणि आता प्रॉडक्शन कॉस्ट काढायला लागले काय? शरद जोशी भेटला म्हणता काय? ठीक आहे, तुमचा शरद जोशी आणि शेतकरी संघटना यांनासुद्धा आम्ही मातीत घालू. आणि, अश्या शर्थीने ते कामाला लागले. अजिबात लाजायला तयार नाहीत. आणि सगळ्यात दुःखाची गोष्ट वाटते – पाण्यालाच आग लागली हो – की, हे आमदार, खासदार, मंत्री, पुढारी आहेत ना ते सगळे भरगच्च झालेत गेल्या ३५ वर्षांत. पेटवले तर दहा पिढ्या विझणार नाहीत. पण यांच्या काळजाची भूक एवढ्याने भागत नाही. यांचे बंगले झाले, गाड्या झाल्या, इस्टेटी झाल्या; सगळे झाले पण त्यांना गरीब शेतकऱ्यांचे सलाम पाहिजेत, सलाम! शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी प्यायल्याशिवाय यांची तहान भागत नाही. आणि हे सगळे शेतकऱ्यांचेच म्हणवणारे आणि त्यातल्या त्यात मराठा जातीचे पुढारी पाहून माझे काळीजच फाटून गेले. न्यायचे कुठे हे दुःख?

या पुढाऱ्यांचा विरोध का? ज्या वेळी अंतुल्यांनी आम्हाला भाव वाढवून दिले तेव्हा सगळीकडे चित्रे पालटायला लागली. आमच्या प्रल्हाद पाटलांच्या फॅक्टरीत, आज तीस वर्षांचा रेकॉर्ड आहे की, दर शनिवारी डायरेक्टर बोर्डाची मीटिंग असली की तीनचारशे शेतकरी हातात चतकोर कागदावर लिहिलेला अर्ज घेऊन पैसे मागायला आलेले असायचे. कुणाची बायको बाळंत व्हायची आहे, कुणाची पोरगी आजारी आहे, पोरीचे लग्न आहे, अमके झाले तमके झाले अश्या संसाराच्या अनेक

अडचणींनी गांजलेले ते शेतकरी आशाळभूतपणे जमत. बाजार भरलेला असायचा लाचारांचा! आणि ज्या वेळी कांद्याला साठ ते पंच्याहत्तर रुपयांचा भाव मिळाला, उसाला २०० रुपये ॲडव्हान्स् आणि पुढे ३०० रुपयांचा भाव मिळाला त्या वर्षी कुत्रंसुद्धा येईना या पुढाऱ्यांना विचारायला फॅक्टरीवर. सगळे बंद. ही जी परिस्थिती निफाडच्या त्या कारखान्यात झाली तशीच सगळ्या महाराष्ट्रात झाली, त्या काळात. आणि ही परिस्थिती पाहिल्याबरोबर हे हरामखोर पुढारी अंतुलेकडे गेले आणि म्हणाले, अरे मामू, तुमने ये क्या किया? अरे साला, ऐसा करेंगे तो राज किसके उपर चलाएंगे? खरे आहे. तुमचे कल्याण करतो म्हणून सांगायला दुसरी गधडी जमात आणायची कुठून? ते काय प्रभात रोड, टिळक रोड आणि डेक्कन जिमखान्यावर येऊन सांगणार आहेत काय की आम्हाला तुमचे कल्याण करायचे आहे? तुम्ही पुणेकर मंडळी सांगाल, बावळीच्या तुझे धोतर सांभाळ, आमचे कल्याण आम्हाला माहीत आहे. पण ही शेतकरी मंडळी म्हणजे बिनडोक प्रजा. ही जर शहाणी झाली आणि यांचे दारिद्र्य जर दूर झाले तर आणखी दोन वर्षांनी या पुढाऱ्यांना थोबाड काढायला जागा रहाणार नाही. तुमचे कल्याण करतो म्हणून कोणाला सांगणार ते? कापड व्यापाऱ्यांना सांगणार का हॉटेलवाल्यांना सांगणार का दुसरे इतर धंदे करणारांना सांगणार?

ज्या वेळी आम्ही दूध आंदोलन केले त्या वेळी सगळे म्हणाले, दूध आंदोलन फसलं, शरद जोशी संपला आणि शरद जोशीची संघटना संपली. नका असे अभद्र बोलू. संघटना संपली का नाही ते काळ ठरवीलच. आज आम्ही खंदकात बसलो आहो. हे सरकार महाडँबीस आहे. ज्या दिवशी दुपारी दीड वाजता आम्ही दूध आंदोलन मागे घ्यायचा निर्णय घेतला आणि त्याची बातमी ताबडतोब रेडिओवर दुपारी दोन वाजता आली आणि मग सकाळी जे सातच्या बातम्यांपर्यंत सांगत होते की मुंबईचा दूधपुरवठा जो ८ लाख १८ हजार लिटर रोजचा होता तो ९ लाख १७ हजार लिटर झाला – म्हणजे आंदोलनकाळात हं? – तेच आंदोलन मागे घेतल्यावर संध्याकाळच्या बातम्यांत काय सांगतात? की आज चार दिवस झाले, मुंबईतील होल दुधाचा पुरवठा आम्ही बंद केला होता तो उद्यापासून पूर्ववत चालू होईल. अश्या तऱ्हा आहेत एकेक!

सगळ्या महाराष्ट्राला मिलिटरी कँपचे रूप आणले होते. एक अर्धा का पाव भरलेला दुधाचा टँकर, जश्या काय त्यातून रिझर्व बँकेच्या नोटा चालल्यात अश्या पद्धतीने नेला जात होता – पुढे दोन पोलीस इन्स्पेक्टरच्या जीप, मागे एस. आर.

पी.च्या चौदा गाड्या मधे ते दुधाचे डबडे घेऊन चालल्या होत्या.

माझी पुणेकर मंडळींकडून एकच अपेक्षा आहे. तुम्ही आम्हाला जाणून घ्या. तुम्ही जाणते जाणकार आहात. तुमच्या विचारांची खोली फार मोठी आहे. पुण्याने फार मोठाले इतिहास घडवलेत. कुठल्याही क्षेत्रातील अनेक विद्वान माणसे या पुण्यात आहेत. तुम्ही आमच्यापेक्षा खूप चांगल्या परीने जगत आहात. तुम्ही पुणेकर मंडळी ज्या तऱ्हेने जगताहात त्या तऱ्हेने आम्ही शेतकऱ्यांनी जगायचे ठरवले तर आम्हाला अजून शंभर वर्षे लागतील. आम्ही कसे जगतो तुम्हाला समजून घ्यायचे आहे? आपटे रोडला किंवा प्रभात रोडला तुमच्या कुटुंबियांसह आठ दिवस बसा परसाकडेला म्हणजे मग तुम्हाला कळेल. म्हणजे मग आमचे अर्थशास्त्रज्ञांनी ठरवलेले श्रममूल्य आणि शेतकऱ्याला भाव वाढवून देण्याइतकी वाईट गोष्टच नाही अशा प्रकारची विधाने यांचे काय दु:ख होते याची थोडीशी झलक तुम्हाला मिळेल.

कोणताही मार्ग काढा. आमचे बापजादे कर्जात मेले. निदान आता आम्हाला तरी या नुकसानीतून बाहेर पडू द्या. चिंचवडपासून पर्वतीच्या पायथ्यापर्यंत अनेक प्रकारच्या अनेक फॅक्टऱ्या आहेत. त्यातला एकतरी व्यवसाय असा सांगा की ज्यातील १०० पैकी १०० माणसे कर्जबाजारी आहेत; कर्जातच जगतात, कर्ज वाढतच रहाते आणि कर्जातच मरतात. आमचे एकच मागणे आहे. आम्हाला लखपती नका करू पण आज १९८३ साल आहे त्यात जग कुठे आहे, तुम्ही कुठे आहात आणि आम्ही कुठे आहोत याचा विचार करा.

आम्ही कुठे आहोत? आमच्या नाशिकपासून १८ मैलांवर एका गावी वसंत कानेटकर एका सभेला आले होते. दोन हजार वस्तीचे गाव. मी कानेटकरांच्या समक्ष गावकऱ्यांना विचारले की, का रे, गावात संडास किती आहेत? गावकरी म्हणाले, एकही नाही. तेव्हा मी कानेटकरांना म्हटले, साहेब, तुम्ही काही दंडकारण्यात आलेले नाही आहात, नाशिकपासून फक्त १८ मैलांवर आहात!

मी ३४ वर्षे या शेतीत राबलो, कष्ट केले. ते सगळे मातीत गेले. दांडेकरसाहेबांनीसुद्धा उभी हयात गोखले इन्स्टिट्यूटमध्ये घालवली. मला माहीत आहे की त्यांनी ती ऐषआरामात घालवलेली नाही, त्यांचा फार मोठा त्याग आहे त्यात. तेव्हा माझी दांडेकर साहेबांना विनंती आहे की यातून काहीतरी मार्ग दाखवा आम्हाला.

पुस्तकप्रकाशन हे निमित्त आहे, त्या निमित्ताने अंतःकरणातील घाव उघडून दाखवता आले. आता हे सहन होत नाही. आमचं कोणी राहिलेलं नाही. तुम्हाला

वाटत असेल की हे राज्यकर्ते शेतकऱ्यांच्यातून आले म्हणजे ते त्यांचे आहेत. पण तुम्ही आम्हाला जर विचाराल की आमचा नंबर एकचा शत्रू कोण तर ते हे सत्ताधारी शेतकरी आहेत हेच त्याचे उत्तर आहे.

तेव्हा दांडेकर साहेबांना माझी विनंती आहे की तुम्ही कुठल्याही प्रकारचा अहंकार, मीपणा मनात न ठेवता जी काही वस्तुस्थिती आहे ती बघावी. कदाचित, हयातभर गोखले इन्स्टिट्यूटमध्ये राहूनसुद्धा तुमच्याकडून काही भाग दुर्लक्षिला गेला असेल, ध्यानात नसेल आलेला. तुमच्या ध्यानात न येण्याचे कारण आमचेच दुर्दैव असेल! समजा, तुम्हालाच वीसपंचवीस वर्षांपूर्वी बसून असा काही क्रांतिकारक विचार सुचला असता, जो शरद जोशींनी चार वर्षांपूर्वी मांडला, तर आजची ही वेळही आली नसती कदाचित. ठीक आहे. शरद जोशींचे काही चुकत असेल. पण त्यांचे बरोबर असेल ते आणि चुकत असेल ते बरोबर करून घेऊन आपल्याला रस्ता काढायचा आहे. तुम्ही, आम्ही काही आपल्या बापाचे नाव उजळण्याकरिता किंवा कुठल्या राजकारणाच्या मोहाने किंवा जनतेला लुटायचे आहे म्हणून, त्यांचे सलाम पाहिजेत म्हणून काही हे व्रत हातात घेतलेले नाही. तेव्हा आपण काही यातून मार्ग काढा.

काल वर्तमानपत्रांतून वाचले की, मोठी जुगलबंदी होणार आहे जोशी-दांडेकरांची. अरे, जुगलबंदी म्हणायला हा काय नाचणारणींचा तमाशा आहे की काय? अरे, आमच्या घराला आग लागली आहे आणि तुम्ही काय शब्द वापरता, जुगलबंदी? ही काय रवि शंकर, अलि अकबर यांची जुगलबंदी नाही. इथे कुणाचा राग नाही, कुणाबद्दल वैर नाही. आम्हाला फक्त मार्ग शोधायाचा आहे – दैन्यातून बाहेर पडायचा.

■

## तीन

# बिगरशेतीतील वरच्या वर्गाचे काढून शेतीतील खालच्या वर्गास द्यावे.

**– डॉ. वि. म. दांडेकर, पुणे**

'महाराष्ट्र टाईम्स'मधील 'कांगावखोर शरद जोशी....' या लेखाचा प्रल्हाद पाटलांनी उल्लेख केला म्हणून मी थोडा खुलासा करतो. आम्ही बिचारे लेख लिहितो आणि मथळा संपादक देतात. लेखात कांगावा हा शब्द मी वापरला आहे. मी त्यात असे म्हटले आहे की, दुधाचे आंदोलन शासनाने दडपून टाकले असे शरद जोशी जे म्हणतात हा त्यांचा कांगावा आहे. अश्या तऱ्हेने तो शब्द त्यात आहे. मी तो माघारी घ्यायला तयार नाही. त्या शब्दाने आपल्याला दुःख झाले असेल पण 'कांगावखोर शरद जोशी....' असा काही माझा शब्दप्रयोग नव्हता. आता त्याचा कांगावा करू नये!

बोलण्याच्या भरामध्ये – बोलण्याचा भर नव्हे तर त्यातला जो तळतळाट आहे,

अन्यायाची चीड आहे त्यापोटी माधवरावांनी सुरुवातीला सांगितले की, कृपा करून हा करमणुकीचा कार्यक्रम मानू नका. मी हे पुन्हा एवढ्याचसाठी बोलतो की तळतळाटाने ज्या मंडळींचा उल्लेख होतो ती म्हणजे आपण इथे बसलेले लोक आहोत. आपण कशाला टाळी देत आहोत, कशाला साथ देत आहोत याचा किंचित नम्रपणे अंतर्मुख होऊन विचार करावा.

आजचा आपला जो प्रश्न आहे त्यातला मूलभूत मुद्दा जो प्रल्हाद पाटील आणि माधवराव मोऱ्यांनी सांगितला आहे तो म्हणजे आपल्या देशामध्ये दोन गट-विभाग-घटक आहेत. शरद जोशींनी मोठ्या कौशल्याने त्यांचा 'इंडिया-भारत' असा उल्लेख केला आहे. मला तर समोर सगळा 'इंडिया'च दिसतो. यापैकी 'भारत' कोण आहे मला माहीत नाही. फार थोडे 'भारती'य इथे बसलेले आहेत. हे जे इंडिया आणि भारत असे गट आहेत त्यांच्यातली जी विषमता आहे, तफावत आहे, फरक आहे याच्यावर बोट ठेवून शरद जोशींनी फार मोठी वैचारिक क्रांती केली असे मी मानतो. मी माझ्या परीने हेच सांगत आलो. मी या गटांना कदाचित 'संघटित-असंघटित' असा शब्दप्रयोग वापरला असेल; आपण 'इंडिया-भारत' वापरता. या दोन गटांतील विषमता भयानक आहे. प्रल्हाद पाटील आणि माधवराव मोरे यांनी बोललेला शब्द न् शब्द खरा आहे.

सुदैवाने, आमचे अर्थशास्त्र कितीही नमकहराम असले तरीही या अर्थशास्त्रातूनही या दोन गटांतील तफावत दिसते. यासाठी मी आपल्याला दोनतीन आकडे सांगतो. आपल्या राष्ट्राचे 'राष्ट्रीय उत्पन्न' म्हणून म्हणायचे ते ठोकळ मानाने नव्वद हजार कोटी रुपये आहे. नव्वद हजार कोटी म्हणजे खूप वाटतील पण त्याला सत्तर कोटी लोकसंख्येने भागले की मग जे काही येईल ते दर डोई उत्पन्न होईल. म्हणजे सरासरी दर डोई उत्पन्न १२८५ रुपये आणि हेही वार्षिक. हो, हे सांगावे लागते! कारण 'इंडिया'त २०००/३००० आकडा सांगितला की सगळ्यांना ते मासिक उत्पन्न वाटते. तेव्हा भारताचे दर डोई वार्षिक उत्पन्न १२८५ रुपये आहे. आता विषमतेकडे वळू.

इंडिया आणि भारत, संघटित आणि असंघटित हे शब्द क्षणभर बाजूला ठेवू. आपण प्रामुख्याने शेतीमालाच्याच प्रश्नाचा विचार करणार असल्यामुळे शेतकरी, शेतमजूर, शेतीउत्पादनावर राबणारी आणि त्यावर अवलंबून असणारी त्याची कुटुंबीय मंडळी हा एक विभाग, जो सुमारे ७० टक्के आहे आणि बाकीचा ३० टक्के बिगरशेती. या दोघांची जर उत्पन्ने घेतली तर ९० हजार कोटी रुपयांच्या राष्ट्रीय

उत्पन्नापैकी ३० हजार कोटी शेतीतले आणि ६० हजार कोटी बिगरशेतीतले अशी विभागणी आहे. त्याला जर ५० कोटी माणसे शेतीतली आणि २० कोटी माणसे बिगरशेतीतली यांनी अनुक्रमे भागले तर शेतीमधल्या राबणाऱ्या माणसाचे दर डोई वार्षिक उत्पन्न ६०० रुपये आणि बिगरशेतीतल्या माणसाचे दर डोई वार्षिक उत्पन्न ३००० रुपये येते. प्रल्हाद पाटील आणि माधवरावांनी जे वर्णन केले त्याच्यामागे अर्थशास्त्राचे हे वास्तव आहे. वार्षिक ६०० म्हणजे रोजचे दोन रुपये. खिशात दोन रुपये घेऊन एकदा दिवसभर जगून बघावे म्हणजे प्रल्हाद पाटील आणि माधवरावांनी सांगितलेल्या परिस्थितीचा अंदाज येईल. आपण जे दैनंदिन जीवनात पहाता, अनुभवता त्याला अर्थशास्त्राच्या शुष्क आकड्यांतही पुरावा आहे आणि तो मला जेवढा कळला तेवढा मी अधूनमधून सांगत आलो आहे. याचा उल्लेख करायचे कारण आपण – प्रल्हाद पाटील आणि माधवराव – माझ्याबद्दल थोडेसे रागावून कमीजास्त बोलला असलात तरी अजून मला आपल्यातला मानता; कुठेतरी मुळातला षड्ज दोघांचा एकच आहे. आपला राग वेगळा, माझा राग वेगळा. माझा राग कल्याण असेल, आपला मल्हार असेल. पण मूळ स्वर एक आहे. म्हणून तुम्ही मला प्रेमाने बोलावलेत आणि मीही इथे आलो आहे.

मी ही जुगलबंदी मानत नाही. सवाल-जबाब आणि मग कशी बाजी मारली असले काही आपल्याला इथे करायचे नाही. हा प्रश्न गंभीर आहे. आहे ही विषमता एकंदर समाजाच्या सामाजिक, आर्थिक विकासाकरिता हानीकारक आहे असे मानणाऱ्यांपैकी मी एक आहे.

शेती आणि बिगरशेती हे जे दोन गट आहेत त्यांत ही अशी विषमता आहे. सहाशे आणि तीन हजार म्हणजे त्यांच्या उत्पन्नांचे प्रमाण एकास पाच असे आहे. अर्थात हीसुद्धा त्या त्या गटातील सरासरी आहे. बिगरशेती गटातही अंतर्गत विषमता आहे, शेती गटातही अंतर्गत विषमता आहे. एकीकडे बागायतदार, बडे शेतकरी, शेतमजूर यांच्यात विषमता आहे तर दुसरीकडे भांडवलदार, कारखानदार, कर्मचारी यांच्यात विषमता आहे. ही विषमता बरोबर नाही. पण या अंतर्गत विषमतेकडे बोट दाखवून शेती आणि बिगरशेती या दोन मोठ्या गटांतील जी विषमता आहे तिच्याकडे दुर्लक्ष करण्याची जी प्रवृत्ती दिसते – डाव्या म्हणा, अतिडाव्या म्हणा मंडळींच्यात – ती शरद जोशींना मान्य नाही आणि मलाही मान्य नाही. याबाबत आमची दोघांची भूमिका एक आहे. म्हणून, आमच्यात जो तपशिलातला मतभेद आहे त्याला महत्त्व आहे. नाही तर एकत्र येण्याचे कारणच नव्हते. मग त्यांनी

आपला तळतळाट करावा आणि मी त्यांची टिंगलटवाळी करावी असा प्रकार झाला असता. पण अशी आमची भूमिका नाही.

ही विषमता कमी केली पाहिजे याच्याबद्दल आमच्यात वाद नाही. वाद इतकाच आहे की, शेतीमालाचे बाजारभाव वाढवून ही विषमता कमी करता येईल काय? भाव वाढवून मिळाले तर ही विषमता, अर्थातच, काहीतरी प्रमाणात कमी होईल. भाव वाढवून मिळाले तर बिगरशेती भागातला काहीतरी पैसा शेती भागाकडे जाईल हे निर्विवाद आहे. पण ते कसे होईल, किती होईल, त्यातल्या अडचणी काय आहेत हे समजावून घेतले पाहिजे. माधवराव म्हणतात, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी – म्हणजे यशवंतराव आले, दादा आले, सर्व आले – तिथे सत्तेवर बसले आणि ते शेतकऱ्यांच्या भल्यासाठी काही करीत नाहीत. तिथे गेल्यानंतर शेतकऱ्यांना ते बुद्ध्याच विसरतात असे म्हणणे बरोबर नाही. माणसे मुंबईत गेली की सहा महिन्यांनी, आपण कुठून आलो ते विसरतात हे होत असेल, नाही असे नाही. परंतु काही प्रश्न अवघड आहेत आणि ते कसे सोडवायचे ते कळत नाही असेही होत असेल. म्हणून पुन्हा एकदा थोडे आकडे सांगतो.

आपण असे धरून चालू की शरद जोशी म्हणतात त्याप्रमाणे शेतीमालाचे भाव उत्पादनखर्चावर आधारित झाले पाहिजेत. निदान दुप्पट झाले पाहिजेत असे धरू; हा दुप्पटीचा आकडा केवळ आकडेमोड सोपी व्हावी म्हणून धरू. होतील न होतील त्याची चर्चा नंतर करू. भाव जर दुप्पट झाले तर मग काय होईल? मगाशी आपण ३० हजार कोटी शेतीचे आणि ६० हजार कोटी बिगरशेतीचे उत्पन्न धरले. शेतीमालाचे भाव जर दुप्पट केले तर हे ३०चे ६० हजार कोटी होतील. म्हणजे शेतीचे ६० हजार कोटी आणि बिगरशेतीचे ६० हजार कोटी असे १२० हजार कोटी रुपयांचे 'राष्ट्रीय उत्पन्न' होईल. शेतीच्या गटात दर डोई उत्पन्न ६०० ऐवजी १२०० रुपये होईल आणि बिगरशेती गटातील उत्पन्न ३०००चे ३००० रुपयेच राहील. कारण आपण असे गृहीत धरू की शेतीमालाचे भाव आपल्या प्रेरणेने, संघटनेने, चळवळीने, आंदोलनाने किंवा कुणाला सुचले म्हणून शहाणपणाने जरी कुणी दुप्पट केले तरी इतर वस्तुंचे भाव दुप्पट होणार नाहीत. नाही तर मग शेतीमालाचे भाव दुप्पट करायचे, मग सिमेंट, लोखंड, सिनेमा – सगळ्यांचे भाव दुप्पट करायचे; म्हणजे मग पुढच्या मृगाला जिथल्या तिथे. शेती-बिगरशेतीतील विषमता १:५ या प्रमाणातच कायम राहील. मग पुन्हा आपलं 'नांगरावं, पेरावं की आंदोलनाला बाहेर पडावं' असा वार्षिक कार्यक्रम सतत करावा लागेल. म्हणून

आपण असे धरू की शेतीमालाचे भाव वाढल्यानंतर त्या निमित्ताने, त्या कारणाने इतर बिगरशेती उद्योग, व्यावसायिक यांचे उत्पन्न निदान रुपयांत वाढू द्यायचे नाही. असे झाले तरच शेतीविभागातले दर डोई उत्पन्न सहाशेचे बाराशे रुपये केले तरीसुद्धा बिगरशेती विभागातील उत्पन्न दर डोई तीन हजार रुपयेच राहील. त्याचे रुपयांतले उत्पन्न कमी करणे अवघड आहे असे मी मानतो. ३०००चे ३००० ठेवणे कितपत सोपे किंवा अवघड आहे ते मागाहून सांगतो.

दिसायला काय दिसले? शेती गटातील उत्पन्न सहाशेचे बाराशे म्हणजे दुप्पट झाले आणि इतरांचे तीन हजारच राहिले. तेवढी विषमता कमी झाली. पण प्रत्यक्षात तेवढीही कमी होत नाही. कारण एकूण उत्पादन तेवढेच आहे. फक्त शेतीमालाचे भाव दुप्पट केले म्हणून मूळ ९० हजार कोटीचे जे राष्ट्रीय उत्पन्न होते त्याची किंमत आता १२० हजार कोटी झाली. म्हणजे रुपयाचे अवमूलन झाले. ज्याला आपण ९० रुपये म्हणत होतो त्याला आता १२० रुपये म्हणायला लागलो.

म्हणजे रुपयाचे २५ टक्क्यांनी अवमूलन झाले. याचा अर्थ असा झाला की बिगर शेतीमधले उत्पन्न रुपयात ३०००च कायम रहिलेले दिसले तरी प्रत्यक्षात त्याला बाजारातून घ्यावयाच्या ज्या वस्तू आहेत – शेतीमाल आणि त्यापासून उत्पादन होणाऱ्या – त्यांची किंमत वाढल्यामुळे त्याचे वास्तव उत्पन्न २५ टक्क्यांनी घटलेले आहे. तसेच शेतीमधले उत्पन्न ६००चे १२०० झालेले दिसले तरी प्रत्यक्षात ते जुन्या रुपयांत ६००चे ९००च झाले आहे.

सारांश, शेतीमालाचे भाव दुप्पट करून दिले तर शेतीमधले दर डोई उत्पन्न ६००चे ९०० म्हणजे ५० टक्क्यांनी वाढेल आणि बिगरशेतीमधले ३०००चे २२५० म्हणजे २५ टक्क्यांनी कमी होईल. म्हणजे विषमता कमी होईल ती बिगरशेती गटाचे कमी करून शेतकऱ्यास दिले तरच होईल. सबंध उत्पादन वाढेल, जिकडे तिकडे सुबत्ता होईल त्या वेळेला काय व्हायचे असेल ते होवो, पण आहे त्या परिस्थितीत जर विषमता कमी करायची असेल तर ज्याच्या खिशात आहे त्याच्या खिशातले काढून ज्याला कमी आहे त्याला देण्याखेरीज विषमता कमी करायचा दुसरा मार्ग नाही.

आता इतकेच विचारतो की आपण जे लोक शेतकरी आंदोलनाला साथ देत आहात, डावे-उजवे-सगळे जे पाठिंबा देत आहेत, दिंडीला हातात झेंडा घेऊन जात आहेत त्या सगळ्या मंडळींना हे – ज्याच्या खिशात आहे त्याच्या खिशातले काढून ज्याला कमी आहे त्याला देणे – मान्य आहे का? 'शेतीमालाला रास्त भाव दिला

पाहिजे. शेतकरी आंदोलनाला आमचा पाठिंबा आहे.' याचा अर्थ असा होतो की, 'शेतीमालाचे भाव वाढल्यानंतर महागाईचा अंक जो वाढेल त्याची भरपाई करण्याकरिता आम्ही ज्यादा महागाईभत्ता मागणार नाही' हे म्हणायला तयार असतील त्यांचाच शेतकरी आंदोलनाला खरा पाठिंबा आहे; बाकीचे ढोंगी, कोणत्याही दिंडीत सामील होणारे बाजारबुणगे आहेत.

प्रल्हाद पाटील, आपण म्हणता की, 'तुमचं आमचं काही वैर नाही.' पण हे खोटे आहे. तुमचं आमचं वैर आहे आणि हे तुम्ही जाणले पाहिजे; हे लपवून ठेवून फार दिवस लपणार नाही. जो संघर्ष आहे तो या दोन घटकांमधला आहे. मग त्याला तुम्ही संघटित-असंघटित म्हणा, इंडिया-भारत म्हणा की शेती-बिगरशेती म्हणा! त्यांच्यामधली जी विषमता आहे ती कमी करायला जेव्हा लागाल तेव्हा नेमका संघर्ष कुणाशी आहे आणि कशाशी आहे हे तुमच्या लक्षात येईल.

म्हणून माझी एवढीच नम्र विनंती की, उगाच नावे घेऊन शासनाला दोष देऊ नका. शासन या संघटितांच्या पाठिंब्यावर, आधारावर, सामर्थ्यावर बसले आहे. ते त्यांचे काहीही कमी करू शकत नाही. आणखी एक गोष्ट सांगतो. तुम्ही पुणेरी लोकांचा उपहास केलात तरी तुमचा संघर्ष पुण्याशी नाही. एक जुनी गोष्ट सांगतो, पाचसात वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. साखरेची निर्यात थांबविण्यात आली होती. त्या वेळी (कै.) शंकरराव मोहिते यांनी सुंदराबाई हॉलमध्ये सभा घेतली होती. कर्मधर्मसंयोगाने मी तिथे अध्यक्ष होतो. दादाच मुख्यमंत्री होते. मी विचारले, तुम्ही सर्व मंडळी शेतकऱ्यांच्या मागण्या मांडण्याकरिता आलात, भाषणं करता, मिरवणुकाही काढण्याचा विचार आहे. पण येताना एक एक पोर – मुलगा, पुतण्या, भाचा, मेव्हणा – आणलाय की नाही दादांच्या पायावर घालायला? याला लावून घ्या, याला लावून घ्या नि याला लावून घ्या म्हणायला? इथे पाणी मुरते आहे, माधवराव! आणि इथे समजुतीचा घोटाळा होतो आहे. तुम्ही कितीही तळतळाटाने बोललात तरी वाद आता तुमच्या आमच्यात राहिला नाही, वाद तुमच्या घराघरात शिरला आहे. दोन पोरांमधील एक पोर बैलांमागे आणि एक बँकेत पगारदार झालेले आहे. हा वाद त्यांच्यातला आहे. हे लक्षात घेऊन संघर्ष कोणात आहे हे समजावून घ्या. मग त्यातील अडचणी, वास्तव, राजकारण, सामर्थ्य, संघटना याची प्रचीती येईल.

नुसतेच शासनाला दोष देऊन भागणार नाही. शासनावर दोष ठेवला म्हणजे तुम्हाला सोपे वाटते. कारण मग वैर फक्त दादांशी, असे वाटते. पण ते खरे नाही.

शरद जोशी संघटक आहेत. ते स्ट्रॅटेजी, डावपेच वगैरे शब्द वापरतात. त्या डावपेचाच हा भाग असेल तर असो. पण, शरद जोशींनी झाकून ठेवले म्हणून संघर्षाचे सत्य स्वरूप झाकून रहात नाही.

तुम्ही शासनाला दोष देत आहात त्याच्या तपशिलात मी जात नाही. शरद जोशी फार प्रभावी व्यक्ती आहेत, शब्द टाकणारे आहेत. 'तूट असेल तर लूट, मुबलकता असेल तर लिलाव', 'गाय आमची, कास तुमची', 'आई जेवू घाली ना, बाप भीक मागू देई ना' इत्यादि म्हणींनी ते शासनाच्या धोरणांचे वर्णन करतात. त्याच्या तपशिलात मी जात नाही. परंतु, ते सारे खरे असले तरी शासनाच्या या धोरणांमुळे शेतीमालाचे भाव खाली आले आहेत हे म्हणणे खरे नाही. शेतीमालाचे भाव शासनाने बुद्धिपुरस्सर, हेतुपुरस्सर धोरणाने खाली ठेवले आहेत असे म्हणण्यात अर्थ नाही, कारण शासन इतके सामर्थ्यशाली नाही. मी आता फार आकडेवारीत जात नाही. तुम्ही जे लेव्हीचे आकडे, निर्यातीसंबंधीचे आकडे मांडता ते मी तत्त्वतः मान्य करायला तयार आहे. परंतु, संपूर्ण शेतीउत्पादनाच्या मानाने हे आकडे नगण्य आहेत. तुमच्या कांद्याला कुणीतरी निर्यातबंदी केली म्हणून सर्व शेतीमालाचे भाव खाली राहिले आहेत हे खरे नाही. शेतीमालाला वरचे बाजारभाव द्यायचे तर शेतमालाच्या आजच्या खुल्या बाजाराऐवजी दुसरी काही पर्यायी व्यवस्था करावी लागेल.

या विषयी काहीजणांचे म्हणणे असे आहे की, शेतीमधील बाजारभाव खाली आले आहेत याचे कारण व्यापारी आणि दलाल आहेत. यांना जर बाजूला करता आले तर ग्राहकाला झीज न लागता शेतकऱ्याला चार पैसे देणे शक्य आहे. मी याच्या तपशिलात जात नाही. पण, व्यापारी-दलाल बाजूला करायचा म्हणजे कुणीतरी त्याची जागा घेतलीच पाहिजे. मालाची खरेदी केली पाहिजे, साठवणूक केली पाहिजे, किरकोळ विक्री केली पाहिजे. हा व्यवहार कुणीतरी केला पाहिजे. या पुस्तकांत आपण कुठेतरी एका ठिकाणी मान्य केले आहे की, सहकारी खरेदीविक्रीची काही व्यवस्था करता आली तर शेतकऱ्याला चार पैसे जास्त मिळू शकतील. निपाणीला आपण एवढा स्वार्थत्याग आणि बलिदान केल्यानंतर गुंडुरावांनी आपल्याला हेच सांगितले की आता तंबाखूच्या खरेदीविक्रीकरिता सहकारी संस्था काढा. परंतु, पुढे जाऊन आपण असे म्हणता की, हे जरी खरे असले तरी आज सहकारी संस्थांचे जे राजकारण चालू आहे त्यावरून असे दिसते की सहकारी संस्थांमधून एका शोषकाऐवजी दुसरे शोषकच फक्त निर्माण होतील. शेतकऱ्याला याच्यामध्ये काही मिळणार नाही. तेव्हा या फंदात पडू नका. तात्पर्य, प्रल्हाद पाटील,

आपले साखर कारखाने जरी सहकारी असले तरी शरद जोशींना एकंदर सहकारी चळवळीबद्दल आस्था किंवा आत्मीयता नाही. या अर्थाने की, सहकारी चळवळीतून शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे काही (निराकरण) होऊ शकेल असे त्यांना वाटत नाही, असे मी समजतो.

दुसरा पर्याय असा की, शासनामार्फत शेतीमालाची खरेदीविक्री करणे. शासनाने एका वर्षी कांदा खरेदी केला आणि त्यात साडेसोळा कोटी रुपयांचे नुकसान झाले. यावर आपण म्हणता की, हे प्रामुख्याने शासनातील भ्रष्टाचारामुळे झालेले आहे. आणि, हे अंशतः बरोबर आहे. सहकाराबद्दल, सरकारबद्दल आपले जे मत आहे त्याबद्दल माझे फारसे दुमत आहे असे नाही.

पण आता मुद्दा इतकाच की, या प्राप्त परिस्थितीमध्ये सरकार नको, सहकार नको, मग कोण पाहिजे? व्यापारी पाहिजे का? आपण जे सगळे मागता आहात आणि घेणार आहोत असे म्हणता आहात त्याकरिता यंत्रणा काय? हे कसे करणार आहात? शासनाचे त्याच्यात काय काम? सहकारी संस्थांचे काम काय? आपल्या ह्या पुस्तकांमध्ये हा एक सूर आहे म्हणून आपल्याला विचारायचे की सरकार नको, सहकार नको मग नक्की काय पाहिजे? व्यापारी का देणार आहेत तुम्हाला उत्पादनखर्चावर आधारित भाव? ही तुमची किरकोळ दोनचार शेतीमालांची उदाहरणे सोडली तर शेतीमालाचा सर्व बाजार व्यापारीच चालवतोय की! अनियंत्रित स्पर्धात्मक व्यापार चालू आहे. आपल्याला त्याच्यामधले धोकेही माहिती आहेत. शेतमालाचे उत्पादन पाऊसकाळाप्रमाणे दर वर्षी कमीजास्त होते. वर्षामध्ये शेतीतील एक माल एकदम पिकत असल्यामुळे बाजारात त्याची आवक वर्षभर सारखी रहात नाही; खूप कमीजास्त होते. त्यामुळे शेतीमालाच्या बाजारात चढउतार होतात आणि व्यापारी त्याचा फायदा उठवतात. त्यातून शेतकऱ्याची पिळवणूक होते आणि एका अर्थी ग्राहकाचीही पिळवणूक होते. हे तुम्ही जाणता, मानता. मग, या व्यापाऱ्यालाच आहे त्या जागी ठेवून तो आपल्या पदरात काय घालणार आहे?

तेव्हा शेतीमालाला, ज्याला आपण रास्त भाव म्हणता, ते मिळवून देण्याची यंत्रणा काय? त्यात सरकारने काय करायचे? सहकारी संस्थांनी काय करायचे? व्यापाऱ्यांनी काय करायचे? या सगळ्यासंबंधी आपण आपली स्पष्ट कल्पना निःसंदिग्धपणे मांडणे आवश्यक आहे असे मला वाटते.

आता मुख्य मुद्द्यावर येतो. आपली मागणी 'उत्पादनखर्चावर आधारित भाव' अशी आहे. शरद जोशींनी उत्पादनखर्च कसे काढायचे हे बऱ्याच तपशिलात लिहिले

आहे. उत्पादनांचा सरासरी खर्च न काढता नवीन बीबियाणे, खतेमुते इत्यादि सर्व वापरणारा एक काल्पनिक आदर्श शेतकरी मानून त्याचा उत्पादनखर्च काढला पाहिजे असे ते म्हणतात. त्याच्या तपशिलात मी जात नाही. माधवराव, माझा जन्म यातच गेला आहे – उत्पादनखर्च काढण्यात. परंतु, त्यातून काहीही निघत नाही. तुम्ही म्हणाल तो उत्पादनखर्च मी काढून दाखवतो. आणि शरद जोशीही तेच म्हणतात हे मी तुम्हाला सांगतो. याबाबतही आमचे एकमत आहे.

असे आहे की, मी बोलतो, तेही तेच बोलतात पण गाठ पडत नाही. एकदा आळंदीला गाठ पडली होती. त्यांनी मला तीन वर्षांपूर्वी त्यांच्या शिबिराला बोलवले होते. पण तेव्हाच त्यांनी ओळखले आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगून टाकले की, हे प्राध्यापक आहेत, यांच्या फार नादी लागू नका. त्यांनीही नाद सोडला आणि आमची पुन्हा गाठ पडली नाही. सुदैवाने, प्रा. कुळकर्णींनी त्यांचे विचार संकलित करून प्रसिद्ध केल्यामुळे मला ते एकत्र वाचायला मिळाले. त्यामुळे, आमचे किती ठिकाणी मतैक्य आहे याचे माझे मलाच आश्चर्य वाटते आहे. मग, मतभेद कुठे रहातो हे अजून मला कळले नाही.

मतैक्य असे की कुठल्याही एका मालाच्या उत्पादकांचे उत्पादनखर्च एक नाहीत हे तेही मान्य करतात. शेतीततर हे असे आहेच हे सर्वांना ठाऊक आहे. अगदी आपली उसाची शेती घेतली तर एकजण ६० टन काढतो तर दुसरा ४० टन; त्यांचे खर्च काही त्या मानाने जास्तकमी आहेत असे नाही. हे उसाचे झाले. बाकी जिराईत पिकांचेही तसेच आहे. कुणी माळावर बाजरी काढतो, कुणी जिराईतात काढतो तर कुणी बागायतीत काढतो. गहू पंजाबात होतो, महाराष्ट्रात होतो. त्यांचे उत्पादनखर्च एक नाहीत. याचे फार वर्णन करण्याची काही जरूरी नाही. औद्योगिक मालांच्या बाबतीतसुद्धा सगळ्या उत्पादकांचे उत्पादनखर्च एक नाहीत.

सर्व उत्पादकांचे उत्पादनखर्च एक नाहीत हे जोशीही सांगतात. तात्पर्य, तुम्ही उत्पादनखर्च कसाही काढा – मोहित्यांचा काढा, कराडांचा काढा, मोऱ्यांचा काढा, कुणाचाही काढा किंवा कोणा काल्पनिक आदर्श शेतकऱ्याचा काढा – आणि त्यावर आधारित भाव ठरवा; भाव काहीही ठरवलात तरी सर्वच्या सर्व उत्पादकांचे उत्पादनखर्च त्यात भागणार नाहीत. काहींचे भागतील, काहींचे भागणार नाहीत. तुमच्या कौशल्याने, संघटित सामर्थ्याने हे उत्पादनखर्च आणि बाजारभाव जेवढे वरती ठेवाल तेवढ्या जास्त लोकांचे उत्पादनखर्च भागतील, पण सर्वांचे भागणार नाहीत.

शरदराव हे कुशल संघटक, आंदोलक आहेतच पण फार प्रांजळ आहेत असे त्यांचे लिखाण वाचून माझ्या लक्षात आले आहे. ते म्हणतात, आपण जरी सगळा उत्पादनखर्च काढला तरी जे काही मिळेल तेच मागितले पाहिजे ना? उगाच आपले काहीतरी मागून कसे चालेल? उत्पादनखर्चावर आधारित बाजारभावाचे हे वर्म आहे. ते म्हणतात, आजच्यापेक्षा पाचपट मागितले तर मागताना बरे वाटेल, पण कोण देईल? निदान दोनपटतरी मागून बघू या. म्हणजे मुद्दा काय, शरदराव? आपण कुशल संघटक व आंदोलक आहात. काय मागून मिळेल, किती दडपणाने मिळेल याचा अंदाज घेऊन मागावे हा जो आपला व्यवहार आहे तो मला मान्य आहे. पण हे जर खरे आहे तर, मला वाटते, उत्पादनखर्चाचे फक्त नाटकच रहाते.

किंबहुना, शरद जोशींनी असे म्हटले आहे की, आपण सगळे आकडे जर नीटनेटके काढायला लागलो तर उत्पादनखर्च एवढे वरती येतात की ते मागून मिळणार नाहीत. म्हणून ते कमी निघावेत यासाठी त्यांनी काही युक्त्या योजल्या आहेत. असे हे युक्तियुक्तीचे काम आहे; अंदाज घेऊन हिशेब मांडायचे. आता दादांशी काल बोलून आले – काय बोलून आले मला माहीत नाही – पण, दादा जर म्हणाले असले की उसाला तीनशेबीनशे काही नाही तर अडीचशेपर्यंत देऊ, तर शरदराव म्हणाले असतील, अडीचशे तर अडीचशे, ठीक आहे – अडीचशेपर्यंत उत्पादनखर्च काढू! असे हे युक्तियुक्तीने, काय मिळेल, काय मागता येईल याचा अंदाज घेऊन उत्पादनखर्च काढायचे काम आहे. त्यांचे लिखाण वाचून मला जे कळले आहे ते बोलतो आहे. त्यांचे शेवटी ऐकायचे आहे. पण, आता मला जे दिसते आहे ते असे आहे.

पुढचा मुद्दा असा – आणि हा आणखी महत्त्वाचा मुद्दा आहे. तुम्ही उत्पादनखर्च काढलात, त्यावर आधारित मागण्याजोगे काय ते ठरवलेत आणि समजा, कांद्याला १०० रुपये आणि उसाला ३०० रुपये मागितले. आपण म्हणता की, आमचा लढा शासनाच्या विरोधी आहे, ग्राहकाच्या विरोधात नाही. मग शासनाने काय करावे अशी आपली अपेक्षा आहे? मी विचारतो, शासनाकडून आपली मागणी काय आहे? पुस्तकी अर्थशास्त्राप्रमाणे मी असे समजतो की, आपली मागणी किंवा अपेक्षा अशी आहे की बाजारामध्ये जेवढा माल येईल तेवढा माल या भावाला किंवा याच्या वरच्या भावाला घ्यायला जर कुणी तयार नसेल तर शासनाने स्वतः किंवा सहकारी संस्थांमार्फत तो सगळा माल घेण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. भावाच्या हमीचा मी हा अर्थ समजतो. इतके दिवस या हमीच्या मागणीबद्दल मी जे काही कमीजास्त

बोललो ते या समजुतीतून बोललो. आता शरद जोशींचे लिखाण वाचून माझ्या असे लक्षात आले आहे की, या विषयी माझी गैरसमजूत होती.

पण, हमीचा असा अर्थ धरून मी आजपर्यंत काय बोललो ते पुन्हाः एकदा सांगतो. समजा, शासनाने अशा हमी भावात शेतीमालाची खरेदी केली – घटकाभर धरून चालू की कांद्याची खरेदी केली. कांदा तसा नाशवंत माल, दूध आणखीनच नाशवंत म्हणून हवे तर ज्वारीचे उदाहरण घ्या; पण, सोपे म्हणून मी कांद्याचे उदाहरण घेतो. एवढा खटाटोप करून आपण हमीची किंमत ठरवून घेतो आहोत म्हणजे बाजाभावापेक्षा चार पैसे जास्त मागणार. दुप्पट मागा, दीडपट मागा, पण बाजारभावापेक्षा काहीतरी वरती मागणार. आता समजा, शासनाने ते मान्य करून बाजारात येईल तो सारा माल हमी किंमतीला खरेदी केला. खरेदी केलेला माल दोन पैसे जास्त घेऊन, निदान खरेदी किंमतीला विकता आला पाहिजे. तसा विकता आला नाही तर नेमकी काय परिस्थिती होईल, या मालाचे शासनाने नक्की काय करायचे याचा आपण जरा विचार करायला पाहिजे. खरेदी करायला फार अक्कल लागत नाही. फक्त खिशात पैसा लागतो. खरेदी केलेला माल नुकसान न आणता विक्री करायला अक्कल लागते. बाजारात जो भाव चालू आहे त्यापेक्षा चढ्या भावाने जर कुणी माल खरेदी करायला सुरुवात केली तर त्याला विक्री अवघड होते. बाजारभावाचा अर्थच तसा आहे. विक्री जर नाही केली तर माल पडून रहाणार. म्हणजे, हमी भावात खरेदी केलेला माल जर शासनाला विकता आला नाही तर शासनाचे पैशांचे नुकसान होणार. शिवाय, माल पडला, फुकट गेला, उंदरांनी खाल्ला, घुशींनी खाल्ला, किडला असे होऊन देशाचेही नुकसान होईल. यावर आपण असे म्हणाल की, मग, शासनाने थोड्याश्या किंमतीत माल विकून टाकावा, थोडे नुकसान सोसावे. परदेशात असे कुठे कुठे करतात असे आपल्या बोलण्यात, लिखाणात कुठेतरी आले आहे असे वाटते. परंतु, खरेदी केलेला माल कमी किंमतीने विकण्यास सुरुवात केली म्हणजे भ्रष्टाचाराशिवाय दुसरे काहीही होऊ शकत नाही. हे समजायला सोपे आहे. शासनाने तुमच्याकडून कांदा १०० रुपयांनी घेऊन दुसऱ्या दिवशी ८० रुपयांनी काढला तर तुम्हीच तो खरेदी करून पुन्हा आपले उत्पादन म्हणून शासनाला विकाल. आपण कराल, व्यापारीही करतील, सर्वजण हेच करतील. शासन दोन दिवसात रिकामे होईल.

शासनाने खरेदी केलेला माल कमी भावात विकायचा तर त्या मालाचे रूपांतर करून, त्याच्यावर प्रक्रिया करून विकला पाहिजे. म्हणजे नुकसान होईल पण ते

काही हिशोबाने होईल. उदाहरणार्थ, गव्हाचा आटा, मैदा, रवा करून विकला तर खरेदीविक्रीचा भ्रष्टाचार होणार नाही. भात खरेदी करून, ते गिरणीत भरडून तांदूळ म्हणून विकता येईल. कडधान्यांच्या डाळी करून विकता येतील. शेंगदाणा घेऊन त्याचे तेल व पेंड करून विकता येईल. कांद्याचे काय करता येईल? मला चटकन सुचत नाही. कदाचित, पावडर करता येईल, नाही तर भजी करावी लागतील! मुद्दा असा की, खरेदीपेक्षा कमी भावाने विकून नुकसान सोसायचे ठरले तरी त्याच्यात अपरिमित भ्रष्टाचार माजू द्यायचा नसेल तर शासनाला शेतीमालाच्या खरेदीचीच नव्हे तर काहीतरी प्रक्रियेची व्यवस्था करावी लागेल.

मग आणखी एक पाऊल पुढे जाऊन रूपांतरित मालाची किरकोळ विक्री करण्यासाठी 'स्वस्त धान्य दुकानां'ची यंत्रणा निर्माण झाली पाहिजे. अशी यंत्रणा निर्माण झाली नाही तर शासनापाशी डाळीचा साठा किती आहे, आट्याचा साठा किती आहे हे जगजाहीर असल्यामुळे व्यापारी तो पाडून घेतील आणि तिथेच पलीकडे दुकान लावून महागाईत विकतील. मी याच्या तपशिलात जात नाही. पण हे सांगायचे मुख्य कारण म्हणजे हा व्यवहार अवघड आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होतो तो त्यांना समजावून देण्यासाठी आपण हा प्रश्न सुलभ करून सांगावा हे ठीक आहे. पण आपणाला तो इतका सुलभ आहे असे समजून चालायचे नाही; त्याच्यातली गुंतागुंत आपल्याला समजावून घेतली पाहिजे. संघटनेने निदान त्यांच्या कार्यकर्त्यांना ती समजावून दिली पाहिजे.

या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन मग आपण शासनाकडून काय मागतो आहोत, शासनाकडून आपल्या काय अपेक्षा आहेत त्या स्पष्ट करायला हव्यात.

आपण सबंध शेतीमालाचा विचार करीत आहोत. आज देशातील शेतीमालाचे एकूण उत्पादन ४५ हजार कोटी रुपयांचे आहे. त्याची खरेदी, प्रक्रिया आणि किरकोळ विक्रीची व्यवस्था झाली नाही, त्यात थोडी जरी गल्लत झाली तर सबंध अर्थव्यवस्था कोलमडून पडल्याखेरीज रहाणार नाही.

म्हणून माझे एवढेच म्हणणे आहे की, याच्यातल्या ज्या अडचणी आहेत, जी गुंतागुंत आहे, याच्याकरिता जी व्यवस्था करावी लागेल – मग ती सरकारी असो, सहकारी असो – तिचा आपल्याला तपशिलात विचार करावा लागेल.

इतके दिवस मी या समजुतीतून बोलत होतो की, शरद जोशी जेव्हा हमीची किंमत म्हणतात, हमीचे भाव मागतात त्या हमीचा अर्थ असा की बाजारात येईल तो माल त्या किंमतीला उठला नाही तर शासनाने तो त्या किंमतीला खरेदी केला

पाहिजे. आता त्यांच्या या पुस्तकांतले सगळे विचार वाचून माझ्या असे लक्षात आले आहे की, शरद जोशींचा असा आग्रह नाही; शासनाने बाजारात येईल तो सारा माल हमी भावाने खरेदी केला पाहिजे असे ते म्हणत नाहीत. हा मुद्दा महत्त्वाचा आहे. म्हणून संदर्भ देऊन मी त्यांचे म्हणणे वाचून दाखवतो. 'भारतीय शेतीची पराधीनता' या त्यांच्या पुस्तकाच्या २६व्या पानावर शरद जोशी म्हणतात, त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट. सरकारने ठरावीक किंमतीला माल विकत घ्यावा अशी जर आपली अपेक्षा असेल तर एक धोक्याचा दिवा दाखवून ठेवतो. आम्ही उत्पादन करू तेवढा सर्व कांदा, कपाशी आम्ही सांगू त्या त्या भावाने विकत घ्यायलाच पाहिजे अशी मागणी आज चालून जाते, उद्याही चालून जाईल पण फार दिवस चालणार नाही. 'तुम्ही कितीही कांदा काढा, आम्ही तो विकत घेऊ' हे कुठल्याही शासनाला शक्य होणार नाही. हे शरद जोशी सांगत आहेत.

आता शरद जोशींना माझे एवढेच सांगणे आहे की, आपण हा जो धोक्याचा कंदील दाखवलेला आहे तो आपल्या सर्व कार्यकर्त्यांनी बघितलेला नाही. काही दिवस हा जरा उंच धरा. आणि धोक्याच्या कंदिलाला दोन बाजू असतात – एक लाल आणि दुसरी हिरवी. आपल्या कार्यकर्त्यांनी लाल दिवा बघितला म्हणजे शासनाला हिरवा दिसेल. आणि शासनाला जर हे कळले की शरद जोशी उत्पादनखर्चावर आधारित भावाची हमी मागतात पण त्या भावाला सगळा माल घ्या असे म्हणत नाहीत तर काहीही अडचण होणार नाही. शासन म्हणेल, ठीक आहे. कांद्याला किती १०० रुपयांची हमी हवी ना? दिली. घेऊन टाकू १०० रुपयांनी; पण सगळा नाही, शंभर क्विंटल! गेल्याच आठवड्यात बातमी वाचली. दादांनी मुख्यमंत्रीपदावर आल्यानंतर ज्या काही दोनचार गोष्टी जाहीर केल्या त्यात काळी ज्वारी १०० रुपये क्विंटलने घ्यायची आणि काळी न झालेली ज्वारी १३० रुपये क्विंटलने घ्यायची हा एक निर्णय आहे. ज्वारी या भावाने घ्यायची पण बाजारात येईल तेवढी नाही, तर प्रत्येक शेतकऱ्याकडून फक्त १५ क्विंटल घ्यायची. प्रत्येकाकडून १५ क्विंटल खरेदी करण्याचा खर्चच एवढा होणार आहे की, त्या खरेदीच्या किंमतीपेक्षा त्यासाठी नेमाव्या लागणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांचे पगार, भत्ते आणि गाड्या अन् घोडे यांचे खर्चच जास्त होणार आहेत. पण, हा तपशील सोडून देऊ. शासनाचे काही नुकसान होईल आणि शासन ते सोसेल.

पण मग मुद्दा असा आहे की, बाजारात येईल तो माल शासनाने विकत घेतला पाहिजे असा आपला जर खरोखरीच आग्रह नसेल, शासनाने नुसते हो म्हणायचे

आणि त्या किंमतीला थोडा माल विकत घ्यायचा, बाकी मालाचे आमचे आम्ही बघू अशी जर तुमची भूमिका असेल तर मग काहीच अडचण नाही, शासनाबद्दल इतका तळतळाट करण्याची जरूरी नाही, आंदोलनाची गरजच नाही. पण, शरद जोशींना हा विषय पक्का माहीत आहे. त्यामुळे ते तो धोक्याचा कंदील दाखवून पुढे म्हणतात की, शासन जेव्हा भावाची हमी देते तेव्हा तुम्ही असे नाही म्हणू शकत की तुम्ही फक्त एवढाच कांदा विकत घ्या, बाकीचा आमचा आम्ही विकू. हे चालणार नाही. तुम्ही 'आमचे आम्ही बघून घेऊ' म्हटले म्हणजे तुम्ही तो कांदा खासगी बाजारात नेणार मग बाजारातील किंमत खाली येणार हे चालणार नाही. म्हणून शरद जोशी पुढे म्हणतात, तो माल शेतात होताच कामा नये असे उत्पादनावरील नियंत्रण नियंत्रित किंमतीच्या मागणीबरोबर येते हे लक्षात ठेवा. माधवराव आणि प्रल्हाद पाटील, हे वाचून ठेवा! याला फार मोठा अर्थ आहे. आणि हे नीट समजले नसेल तर शरद जोशी कॅलिफोर्नियाचे, अमेरिकेचे उदाहरण देऊन सांगतात की, कॅलिफोर्नियात मोसंब्याला जर मोठा बहर आला तर स्प्रे करून ठरावीक मोसमात मोहोर पाडावा लागतो. कांद्याचे फार उत्पादन झाले तर आपल्यालाही कसलातरी स्प्रे वापरावा लागेल.

या विषयाचे हे मर्म आहे. हे जर आपण जाणत असलात तर याचा अर्थ समजावून घ्या. उत्पादनावरील नियंत्रण म्हणजे काय? कॅलिफोर्नियात लहान लहान सोसायट्या आहेत. ते स्प्रे करून नियंत्रण करतात. आपल्याला काय करावे लागेल याचा, शरद जोशी आपण विचार केला आहे की नाही माहिती नाही; पण, माझा अंदाज आहे त्याप्रमाणे सांगतो काय करावे लागेल ते.

प्रथम आपण भाव सांगायचा की आम्ही आमच्या कांद्याला शंभर रुपये घेणार. मग शासन म्हणणार की, ठीक; आम्ही या भावाने काहीतरी १००० टन कांदा घेऊ. मग हा जो हजार टनाचा कोटा ठरला त्याचे वाटप करण्यासाठी जमले तर शेतकरी संघटनेने, नाही तर मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेतली पाहिजे, त्यात कांद्याच्या एकूण कोट्याची प्रांताप्रांतात वाटणी होईल. मग शरद जोशी किंवा दादा महाराष्ट्राचा कोटा घेऊन आले की महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या शेतीसमित्यांच्या अध्यक्षांची बैठक घेऊन महाराष्ट्राच्या कोट्यापैकी नाशिकात किती, पुण्यात किती, औरंगाबाद किती – औरंगाबादचा विचार करताना मराठवाड्याचा बॅकलॉग लक्षात घेऊन त्यांना किती – अशा प्रकारे जिल्हावार वाटप करायचे. मग तालुकावार, गाववार आणि शेवटी शेतकरीवार कांदाउत्पादनाचे वाटप होईल. कोणीही यापेक्षा जास्त कांदा करता

कामा नये. नाही तर शेतकरी संघटना रस्ता रोखून त्याचा कांदा बाजारात जाऊ देणार नाही. आज शासनाचा रस्ता रोखू पहाताहात, उद्या शेतकऱ्याचा रस्ता रोखावा लागेल!

उत्पादनावरील नियंत्रण याचा हा अर्थ आहे. याचा खरा अर्थ असा की, कुठल्याही मालाची कृत्रिम टंचाई निर्माण करून व्यापारी किंवा उत्पादक हवा तो माल हवा त्या किंमतीला विकू शकतो. मक्तेदार व्यापारी हे करू शकतात. साठवणूक करतात, काळाबाजार करतात; माल नाही म्हणतात आणि मागल्या दाराने विकतात. मक्तेदार उत्पादक तेच करतात. अमुक किंमतीच्या खाली माल नाही द्यायचा तर उत्पादन कमी करा. शेतकऱ्यांना आपले जर एवढेच सांगणे असेल की, बाबा रे, तुमचे दौर्बाल्य कशात आहे? शेतीमध्ये असंख्य लहानमोठे शेतकरी आहेत. त्यांची मक्तेदारी नाही होऊ शकत. कांद्याला कोटा मिळाला तर आपसात वाटायला नाही जमत. म्हणून बंधुनो, संघटना करा आणि संघटनेच्या सामर्थ्यावर मक्तेदारी स्थापन करा. उत्पादन कमी करू मग भाव कसा नाही मिळत ते कळेल. हे जर सांगणे असेल तर शंभर रुपये का हो, फक्त पंचतारांकित हॉटेलमधेच खाता येईल एवढाही कांद्याचा भाव आपल्याला करता येईल. त्याच्याहीपेक्षा महाग केलात तर फक्त वासाला कांदा! शंभर रुपयाला एक कांदा! आणि आज आपण मला या प्रकाशनानिमित्त जे रौप्य पदक भेट म्हणून दिलेत त्याऐवजी पुढच्या वर्षी एखादा कांदा भेट म्हणून द्याल!

आपल्या मालाला जास्त भाव हवा तर उत्पादननियंत्रण करावे लागेल असे शरद जोशी सांगतात. त्याचे कारण काय? कारण एवढेच की जास्त भाव झाला की तो ग्राहकाला परवडत नाही आणि तो कमी माल घेतो. दुधाचा भाव लिटरला चार रुपये होता तेव्हा मी एक लिटर दूध घेत होतो; आता पाच रुपये झाला तर मी पाऊण लिटर घेऊ लागलो. उत्पादकाचे व ग्राहकाचे वैर आहे म्हणून नव्हे. पण उत्पादकाचा उत्पादनखर्च आहे तसा ग्राहकाचा संसारखर्च आहे. प्रल्हाद पाटील म्हणतात, १ रुपया साठ पैशाचा गहू १० पैशांनी वाढला तर महागाई वाटते आणि दुसरीकडे वासनांच्या धिंगाण्यावर लाखो रुपये खर्च होतात. हे खरे आहे. पण, प्रल्हाद पाटील! या धिंगाण्यात सारी पुण्याचीच माणसे नाहीत, बाजारात कांदा घेऊन आलेली मंडळीही यातच सामील होतात. मलाही पुष्कळ आश्चर्य वाटते. माणसे दुधाच्या बाटलीला दीड रुपया द्यायला तयार नाहीत पण लिम्काच्या बाटलीला दोन रुपये देतात आणि मोसंबीनारंगीला दहा रुपये देतात! पण ही सारी माणसे पुण्यातली नाहीत;

माधवरावांनी सांगितल्याप्रमाणे ज्यांच्या आयाबहिणींना परसाकडे बसायला आडोसा नाही त्या आयाबहिणींचे पूतच दुधाच्या बाटलीला एक रुपया देत नाहीत पण बेवड्याला दहा रुपये देतात. प्रल्हाद पाटील, या पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात आक्रोश करून काय उपयोग? माणसे येथूनतेथून सगळी सारखीच आहेत.

जरा मागे येऊ. शरद जोशी म्हणतात त्याप्रमाणे उत्पादननियंत्रण करून आपण शेतमालाचे बाजारभाव वर ठेवले असे घटकाभर समजू. त्याचा लाभ कोणास मिळणार? शेतकरीसमाज हा काही एकजिनसी नाही; बाजारभावाच्या संदर्भात निदान तीन वर्गतरी मान्य करावे लागतील. एक म्हणजे ज्यांना बाजारात विकायला सापडते म्हणजे नगदी पिके घेणारे किंवा मोठे भुसार करणारे. ज्या प्रमाणात माल बाजारात जाईल त्या प्रमाणात यांना बाजारभावाचा लाभ मिळेल. दुसरा वर्ग ज्याला बाजारात विकायला सापडत नाही किंवा थोडेबहुत विकले तरी बरेच विकत घ्यावे लागते. बाजारभावाचा वट्ट फायदा या वर्गाला काही नाही. तिसरा वर्ग शेतमजुरांचा. शेतीमालाचे बाजारभाव वाढले तर शेतमजुरीचे दर वाढतील का? या विषयी शरद जोशी स्पष्ट बोलत नाहीत. एकदा म्हणतात की, कांदा व उसाचे भाव वाढले तेव्हा शेतमजुरीचे दर वाढले. पण असेही म्हणतात की, शेतीमालाचे बाजारभाव वाढले म्हणजे मजुरीचे दर आपोआप वाढत नाहीत. हे जर तसे वाढले नाहीत तर शेतीमालाच्या वाढीव भावांना आधारही मिळणार नाही. बाजारभावाला आधार असतो तो उत्पदनखर्चाचा नसतो, तो ग्राहकाच्या क्रयशक्तीचा असतो. ग्राहकाची क्रयशक्ती न वाढवता मालाचे भाव वाढवले तर उत्पादन वाढवण्याऐवजी उत्पादननियंत्रण करूनच बाजारभाव वर ठेवावे लागतील. त्यामुळे चार लोकांना चार पैसे जास्त मिळतील परंतु दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाही. मोठा शेतकरी, लहान शेतकरी, शेतमजूर इत्यादि घटकांचा विचार करायचा तो यासाठी, त्यांच्यात भांडणे लावण्याकरिता नव्हे.

शेतमालाचे बाजारभाव वाढवून दिले तर त्याची झळ बिगरशेती विभागाला लागेल हे उघड आहे. आणि तशी अपेक्षाही आहे. परंतु, शेतकरी विभाग एकजिनसी नाही तसाच बिगरशेती विभागही एकजिनसी नाही. त्यांतही विषमता आहेच. शेतमालाचे भाव वाढवले तर त्याची झळ सर्वांना सारखीच लागणार नाही. श्रीमंतांपेक्षा गरिबांना जास्त लागेल. कारण, श्रीमंतापेक्षा गरिबाचा खर्च शेतमालावर जास्त होतो. तात्पर्य, शेतीमालाचे बाजारभाव वाढवून दिले तर बिगरशेतीतील खालच्या वर्गाचे काढून शेतीतील वरच्या वर्गाची भरपाई होईल. यातून

दारिद्र्यनिवारण होऊ शकत नाही.

म्हणून, माझे म्हणणे असे आहे की शेती व बिगरशेतीतील विषमता कमी झाली पाहिजे पण त्याची प्रक्रिया अशी असावी की, बिगरशेतीतील वरच्या वर्गाचे काढून शेतीतील खालच्या वर्गास द्यावे. हे रोजगार हमी योजनेने साधते. रोजगार हमी योजनेत जो पैसा शेतमजूर किंवा मजुरीवर अवलंबून रहाणारा लहान शेतकरी यांच्या हातात जाईल त्याचा शेतमालांच्या बाजाभावांना आधार मिळून तो थोड्याच अवधीत शेतीतील वरच्या वर्गात येईल. तळात कितीही घातले तरी थोड्याच अवधीत ते वरती येते. आर्थिक शोषणाची, आर्थिक अभिसरणाची प्रक्रिया अशीच आहे.

सारांश, शेतमालाचे बाजारभाव वाढविण्यापासून सुरुवात केली तर बिगरशेतीतील तळातले काढून ते शेतीतील माथ्यावर घातले जाईल. तेथून ते सहजासहजी खाली उतरणार नाही. उलट, रोजगार हमी योजनेने शेतीतील तळात क्रयशक्ती निर्माण केली तर शेतीमालाच्या बाजारभावाला या क्रयशक्तीचा आधार मिळेल आणि ती सहजगत्या शेतीतील वरच्या थरापर्यंत येईल. म्हणून, शेतीमालाच्या बाजारभावाच्या हमीने सुरुवात न करता रोजगाराच्या हमीने सुरुवात करावी असे मी म्हणतो.

रोजगार हमी म्हणजे ग्रामीण माणसाच्या श्रमाला दिलेली किमान निर्वाहक्षम वेतनाची हमी. हे श्रम सर्व शेतमालाच्या उत्पादनखर्चाच्या बुडाशी आहेत. म्हणून म्हणतो, उसाचे, कापसाचे, कांद्याचे, तंबाखूचे – प्रत्येक मालाचे उत्पादनखर्च काढण्यापेक्षा माणसाच्या किमान निर्वाहाचा खर्च काढा आणि त्या वेतनावर जो दिवसाचे सात तास काम करण्यास तयार आहे त्याला रोजगाराची हमी मागा. मालाच्या किंमती ठरवण्यापेक्षा या देशात माणसाची किंमत काय आहे ते विचारा. माधवराव, प्रल्हाद पाटील, आपण श्रममूल्याचा उपहासाने उल्लेख करता. माझे म्हणणे आपणास कळलेले नाही असे वाटते. शरद जोशींनीही ते समजून घेण्याचा, आपणास समजावून सांगण्याचा यत्न केलेला नाही असे दिसते. प्रल्हाद पाटील, आपण विचारता, बँकेतील शिपायाला महिना हजारबाराशे का आणि शेतमजुराला दिवसाचे पाच रुपये का? मीही हाच प्रश्न विचारतो आहे. माणसामाणसात एवढा फरक का? हा फरक बघायला पुण्याला यायची गरज नाही. आपण साखर कारखाना चालवता ना? मग, उसाच्या शेतीत शेतमजुराला मजुरी किती आणि साखर कारखान्यात कामगाराला किती याची चौकशी करा!

उपस्थित बंधुभगिनींनो, आपणास शेतकऱ्याबद्दल सहानुभूती आहे. माधवराव

मोरे आणि प्रल्हाद पाटील यांच्या भाषणाला आपण साथ दिली म्हणून सांगतो. आठ, दहा सोडा, पण काम करील त्याला दिवसाचे पाच रुपये दिले तर या देशात कोणालाही पाचशे रुपयांपेक्षा जास्त पगार घेता येणार नाही. हे पटत असेल तर टाळ्या वाजवा, नाही तर दोन तास करमणूक झाली म्हणून माघारी जा.

आणि माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील, आपण मला प्रेमाने सांगितले म्हणून मीही प्रेमाने सांगतो. डॉक्टर म्हणतो रोग जुना आहे, अवघड आहे. काही औषधपाणी करू. परंतु, पुष्कळ पथ्याने रहावे लागेल. हळूहळू ताकद येईल, तसा रोग हटेल. आपण फार दिवस सोसले, आता कळ निघत नाही हे मला कळते. पण आता मांत्रिक भेटला म्हणून डॉक्टरला नमकहराम म्हणू नका, गंडेदोरे करून झाले की डॉक्टरला माघारी बोलवावा लागेल.

■

## चार

**गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून तुम्ही जे प्रयत्न करीत आहात तेवढे बंद करा म्हणजे गरिबी आपोआप हटेल.**

**– श्री. शरद जोशी**

दांडेकरांच्या 'डॉक्टर आणि मांत्रिक' यांचा उल्लेख ऐकून 'एकच प्याला'मधल्या तळीरामाच्या आजारपणाच्या प्रवेशाची आठवण झाली.

डॉक्टर आणि मांत्रिक यांच्यातला फरक काय? जो योग्य विश्लेषण करतो, जुन्या विचारांना चिकटून रहात नाही, अपयश आले तर ते का आले याची कठोर चिकित्सा करतो आणि नवी उपाययोजना सुरू करतो तो डॉक्टर. पस्तीस वर्षांच्या अपयशानंतर रोगी मरायला टेकला तरी आपली निदाने आणि योजना यांचा संपूर्ण फेरविचार जो करीत नाही तोच मांत्रिक. खरे म्हणजे डॉक्टरसाहेब, इतके दिवस ज्याच्या सल्ल्याने आम्ही चाललो त्या मांत्रिकाचा गंडादोरा संपला आहे. तो आम्हाला विषच घालत होता हे आता समजले आहे. पहिल्यांदाच आम्ही डॉक्टरकडे आलो आहोत.

चाकणचे कांद्याचे आंदोलन नुकतेच आटोपले होते. त्या वेळी कार्यकर्त्यांना काही प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याची जाणीव झाल्यानंतर आळंदीला जे मर्यादित स्वरूपाचे प्रशिक्षण शिबिर भरवले होते त्याला मी मुद्दाम आग्रहाने डॉ. दांडेकरांना बोलावून नेले होते. त्या वेळेपासून आम्हा दोघांच्या विचारांतील समांतरता आणि तसेच काही तपशिलातील फरक याची आम्हा दोघांनाही पुरेशी जाणीव आहे. पण दांडेकरांनी 'असा कांगावा केला' म्हटले की त्यांच्या लेखाला 'कांगावखोर शरद जोशी' असे शीर्षक देणारी मंडळीही महाराष्ट्रात खूप आहेत; आणि गोविंद तळवळकरांची तर ही खास शैली आहे.

दांडेकर आणि मी, आमच्यामध्ये जो काही फरक आहे तो लोकांसमोर यावा आणि जो फरक असेल तो फरक समोर ठेवूनसुद्धा जोपर्यंत या कार्यक्रमामध्ये आपण एका दिशेने जाऊ शकतो तोपर्यंत आपल्या मैत्रीत कोणत्याही प्रकारचा बाध येण्याची आवश्यकता नाही असे मानणारा मी आहे. आज आम्ही दोघेही एका व्यासपीठावर येऊ शकतो यालाही एक महत्त्व आहे. आम्ही कार्यक्रमात एकत्रितपणे सहभागी होत असलो तरी माधवराव मोरे आणि माझ्यात संपूर्ण एकमत आहे असे मुळीच नाही; प्रल्हाद कराड पाटील आणि माझ्यातही पुष्कळ मतभेद आहेत. तसे दांडेकरांमध्ये आणि माझ्यामध्येही मतभेद आहेत. पण यांतील काही मतभेदांचे आभासही असण्याची शक्यता आहे. आणि, आमच्या अशा एकत्र येण्यामुळे, परस्पर संवादामुळे ते दूर होणे साध्य आहे. उदाहरणार्थ, 'आम्ही बाजारात आणू तितका माल शासनाने घेतलाच पाहिजे' अशी आमची मागणी आहे असे गृहीत धरून दांडेकरांनी 'महाराष्ट्र टाईम्स'मधील त्या प्रख्यात लेखात बरेच लिहिले आहे. पण आता आमच्या विचाराचा थोडा परिचय झाल्यानंतर त्यांचा हा गैरसमज आपोआप दूर झाला, तसेच इतर गैरसमजही दूर होतील. काही बाबतींत कदाचित दांडेकर माझा विचार जास्त चांगल्या रितीने समजून देऊ शकतील. या दृष्टीने वारंवार जवळ येणे आवश्यक आहे आणि त्याची आज सुरुवात झाली आहे असे मी मानतो.

डॉ. दांडेकरांनी अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. मी जे काही उत्तरादाखल बोलणार आहे त्यामधून त्या त्या मुद्द्यांचे विवेचन आपण यथायोग्य अनुक्रम लावून समजून घ्याल आशी आशा आहे.

प्रथम काही जुजबी मुद्दे.

'जर का शेतीमालाचे भाव दुप्पट झाले तर शेतीतील उत्पन्न दर डोई ६०० रुपयांवरून ९०० रुपयांवर जाईल आणि त्याच वेळी शहरी नागरिकाचे दर डोई

उत्पन्न प्रत्यक्षामध्ये ३००० रुपयांवरून २२५० रुपयांपर्यंत उतरेल.' आमच्या आंदोलनात जे सामील होऊ पहातात, त्यासाठी दिंड्या काढतात त्यांना हा बदल मान्य आहे का हे विचारून घ्या, तपासून पहा असे दांडेकरांनी म्हटले. हे आम्ही फार पूर्वी तपासून घेतले आहे. आणि त्यांना हे मान्य होऊच शकणार नाही हे लक्षात आल्यामुळे आम्ही त्यांना आमच्यात मुळी येऊच दिले नाही हे मी दांडेकरांना विनम्रपणे सांगू इच्छितो. त्यांना वेगळ्या दिंड्या काढाव्या लागल्या.

शंकरराव मोहिते आणि राजाराम बापू पाटील यांच्या भूमिकांविषयी बोलताना दांडेकरसाहेब आमच्याकडे खोचून पहात होते. मी सांगू इच्छितो की, या दोघांचा आणि आमचा रतिमात्र संबंध नाही. उलट, सगळ्या महाराष्ट्रभर सहकारी साखर कारखान्यांच्या कारभाऱ्यांविरुद्ध त्यांच्या एकूण व्यवस्थेबद्दल आणि कारखाने निघूनसुद्धा शेतकऱ्याच्या उसाला भाव मिळाला नाही याबद्दल कुणी वणवा पेटवला असेल तर तो फक्त शेतकरी संघटनेनेच पेटवला. हाती सातबाराचा उतारा आहे म्हणून अशी मंडळी आणि शेतकरी संघटना यांच्यात गोधळ केला तर ते योग्य होणार नाही.

एक गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो की, उत्पादनखर्च म्हणजे काय, तो कसा काढायचा, तो काढताना किती अडचणी येतात, किती वेगवेगळ्या ठिकाणी कसे वेगवेगळे उत्पादनखर्च आहेत हे सगळे मलाही माहीत आहे. मी अर्थशास्त्रज्ञ कदाचित म्हणवून घेऊ शकत नसेन पण मी अर्थशास्त्राचा एक विनम्र विद्यार्थी आहे.

उत्पादनखर्चाच्या आकड्यांत फरक आहेत का? आहेत. उत्पादनखर्चामध्ये फरक आहेत, उत्पादनखर्चाची व्याख्या करण्यात फरक आहेत आणि, त्याच्याही पलीकडे, कोणत्याही एका शेतकऱ्याचा उत्पादनखर्च काढायचे ठरवले तर तेसुद्धा फार कठीण काम आहे. पण या सगळ्या अडचणी राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा काढताना येतात की नाही? तात्त्विकदृष्ट्या त्यात फरक पडतो की नाही? राष्ट्रीय उत्पनाच्या कोणत्याही अहवालाच्या पहिल्या धड्यामध्ये याच तऱ्हेच्या अडचणी मांडल्या जातात. पण राष्ट्रीय उत्पन्नाचे हिशेब तयार होतातच! निर्देशांकांच्या बाबतीतही अशाच प्रकारच्या अडचणी येतात. पण जर का अशा हिशेबावरती सरकारी नोकरांचा महागाईभत्ता ठरवायचा असेल तर त्या अडचणी पटकन दूर होतात; शेतीमालाच्या भावाबद्दल काही ठरवायचे असेल तर मात्र त्या पर्वतप्राय वाटतात!

कृषिमूल्य आयोग तयार झाल्यानंतर पंधरा पंधरा वर्षांनंतर स्वतः शेतकीमंत्री

कबूल करतात की, आम्ही गेली पंधरा वर्षे शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना शेतीत जो कारभारी असतो त्याचा म्हणजे 'Arranging the inputs'चा खर्च धरायचा विसरून गेलो; औजारांचा, औतांचा जो दुरुस्तीखर्च असतो तो विसरून गेलो, एवढेच नव्हे तर हवामानातील फरकामुळे, पाऊस कमीजास्त झाल्यामुळे जी पीकबूड होते त्या पीकबुडीचा हिशेबसुद्धा धरायचा विसरून गेलो. हे असे शेतकीमंत्री म्हणतात. पंधरा वर्षे ते अश्या तऱ्हेने विसरून जातात हा केवळ अपघात आहे असे मी मानीत नाही. हे हेतुपुरस्सर होते. पस्तीस वर्षे हे झाल्यानंतर जर कुणी म्हणू लागला की, आमची चूक झाली हो, तर अर्थ कसा लावायचा?

मी शेतकऱ्यांसमोर बोलताना एक उदाहरण सांगतो. एक आई आहे. तिला एक सख्खे मूल आहे आणि एक सावत्र मूल आहे. सख्खे मूल गुटगुटीत आहे, चांगले कपडे घालून शाळेत जाते आणि सावत्र मूल मात्र अगदीच रोड झाले आहे. ती आई जर सांगू लागली की, माझे दोघांवरही सारखेच प्रेम आहे हो. पण खायची वेळ आली की सख्खे मूलच पुढे येते आणि कामाची वेळ आली की सावत्र मूलच पुढे येते. तर आपण असे म्हणू की, हे असे एखादा आठवडा चालेल.

पस्तीस वर्षे हे असे अपघातानेच चालू शकत नाही. यामागे योजना आहे; हे ठरवून होते. याचा अर्थ असा नाही की कुणी मंडळी – पंडीत नेहरू, वल्लभभाई पटेल वगैरे – कुठे एका खोलीमध्ये जमले आणि त्यांनी कोपऱ्यात बसून ठरवले की, या शेतकऱ्यांना पिळायचे, बरे का! आमचा असा आरोप नाही. पण अर्थव्यवस्थेचे एकंदर परिणाम लक्षात घेऊन आम्ही असे सिद्ध करतो की अगदी नियमबद्ध रितीने, पद्धतशीर रितीने एक शोषणाचे धोरण हेतुपुरस्सर चालविण्यात आले आहे. खुनाच्या खटल्यातसुद्धा खुनाच्या आरोपींच्या वर्तणुकीच्या आणि त्यांच्या कृतीच्या परिणामावरून कटाचा आरोप सिद्ध झाला असे मानले जाते.

'शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र' असा शब्दप्रयोग मी मुद्दाम वापरतो आहे. माझी आज अशी अपेक्षा होती की, या अर्थशास्त्राबद्दल थोडा जास्त विचार होईल. कारण मी 'शेतीमालाला रास्त भाव' हा एककलमी कार्यक्रम हा संपूर्ण दारिद्र्यविरोधी कार्यक्रम आहे हे आग्रहाने आणि जाणीवपूर्वक मांडले आहे.

आजपर्यंत झालेला विकास हा कामगारांच्या शोषणावरती, ग्राहकांच्या शोषणावरती आणि शेतकऱ्यांच्या म्हणजे कच्च्या मालाच्या शोषणावरती अवलंबून होता. दुसऱ्या महायुद्धाच्या अंतापर्यंत, म्हणजे अजून वसाहती स्वतंत्र होऊ लागल्या नव्हत्या तोपर्यंत काही ठरावीक देशांमध्ये हा विकास चालू राहिला. कामगारांच्या

शोषणावर चर्चा झाली, लिखाण झाले; ग्राहकांच्या शोषणावर चर्चा झाली, लिखाण झाले परंतु शेतकऱ्याच्या आणि कच्च्या मालाच्या शोषणावर त्या मानाने लिखाण झाले नाही, त्याकडे दुर्लक्ष झाले. याचे कारण लिहिणारे सगळे ज्या देशांत औद्योगिकीकरण होत होते त्या 'देशां'तले होते. 'हिंदुस्थाना'तील शेतकऱ्याच्या शोषणाकरिता रडायला पुरेसे अश्रू त्यांच्याकडे नव्हते.

दुसरे महायुद्ध झाल्यानंतर जसजश्या वसाहती स्वतंत्र होऊ लागल्या तसतशी, मनुष्यजातीच्या इतिहासात प्रथमच, एक नवीन समस्या जगामध्ये निर्माण झाली. शेतीमालाचे – कच्च्या मालाचे – शोषण न करता औद्योगिकीकरण करता येते किंवा नाही असा प्रश्न निर्माण झाला. कारण तोपर्यंत, एखादा अपवाद वगळता, दुसऱ्या देशामधील – वसाहतीमधील – कच्च्या मालाचे शोषण न करता ज्या देशात औद्योगिकीकरण झाले आहे असे उदाहरण नव्हते. दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा वसाहती स्वतंत्र होऊ लागल्या तेव्हा प्रश्न असा निर्माण झाला की (स्वतंत्र झालेल्या) हिंदुस्थानसारख्या देशाकडे वसाहती नाहीत, ज्या देशातील कच्च्या मालाचे शोषण करता येईल असा दुसरा देश ताब्यात नाही; मग अशा देशांना औद्योगिकीकरण करता येईल की नाही? याचे उत्तर एक मार्क्सवादी रोझा लुक्झेंबुर्ग यांनी देऊन ठेवले आहे की, जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होईल तेव्हा त्या देशांमध्ये अंतर्गत वसाहतवाद तयार होईल आणि देशाचा एक भाग दुसऱ्या भागातील कच्च्या मालाचे शोषण वसाहतवादी पद्धतीने करील. रोझा लुक्झेंबुर्गने Town and County म्हणजे शहरे आणि खेडी असे विभाग मानले होते. मी त्याला 'इंडिया आणि भारत' असा शब्दप्रयोग अशाकरिता वापरतो की यात शहर आणि खेडी असा काही श्लेष, असे काही विभाजन आहे असे मी खरोखरीच मानीत नाही.

'भारत आणि इंडिया' याची व्याख्या या पुस्तकांत अगदी स्पष्टपणे दिली गेली आहे. इंग्रज निघून गेल्यानंतर त्यांच्या वसाहतवादी शोषणव्यवस्थेचा वारसा हिदुस्थानातील ज्या आर्थिक क्षेत्राला, ज्या लोकांना मिळाला, ज्या समाजाला मिळाला तो 'इंडिया' आणि ज्यांचे शोषण नवीन व्यवस्थेखाली, नववसाहतवादाखाली चालू राहिले त्यांचा समाज म्हणजे 'भारत' होय.

जर हे शोषण थांबले तर औद्योगिकीकरण थांबणार नाही, उलट औद्योगिकीकरण जास्त झपाट्याने होईल, जास्त संतुलित रितीने होईल. हा विचार मी फार गंभीरपणे मांडला आहे.

शेतीमालाला रास्त भाव मिळाल्यास त्याचा फायदा छोटा शेतकरी, भूमिहीन

शेतमजूर यांच्यापर्यंत पोहोचतो किंवा नाही याबद्दल आता काही शंका राहिलेली नाही. शेतीमालाला रास्त भाव मिळाला तर मजुराला फायदा मिळतो, मालकापेक्षाही जास्त प्रमाणात मिळतो.

शेतकऱ्याच्या हाती पैसा पडल्यानंतर तो काही उदार आहे म्हणून मजुराला किंवा भूमिहीनाला देत नाही. पैसा हातात पडतो असे दिसल्यानंतर तो उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करतो, हंगामात मजुरांचा तुटवडा पडत असल्यामुळे मजुराची मजुरी वाढवून देणे त्याला भाग पडते. मी आज एका तत्त्वाच्या स्वरूपात सांगतो आहे आणि जे गेल्या तीन वर्षांत केवळ उसाच्या आणि कांद्याच्या उदाहरणांनी सिद्ध करून दिले आहे की, जेव्हा शेतीमालाला रास्त भाव मिळतो म्हणजे उत्पादनखर्च भरून निघणारा भाव मिळतो तेव्हा मजुरीचे दर शेतीमालाचे भाव ज्या गतीने वाढतात त्यापेक्षा जास्त गतीने वाढतात. हे महाराष्ट्रात तपासून घेता येईल. मला असे म्हाणायचे नाही की मी हे म्हणतो आहे म्हणून तुम्ही मान्य करा. (अर्थव्यवस्थेसंबंधी अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या संस्था आहेत. तेथील एखाद्या मनुष्याने किंवा खात्याने जर ठरविले तर शेतीमालाला भाव मिळाल्यानंतर काय काय परिणाम होतात, खास करून शेतमजुरीच्या दरांवर काय परिणाम होतात याचा अभ्यास फार चांगल्या तऱ्हेने होऊ शकेल अशी आज महाराष्ट्रात संधी मिळत आहे. मी डॉ. नीळकंठ रथांना असा अभ्यास करून बघा अशी विनंती केली होती.)

हे तत्त्व मांडीत असताना मी त्याच्याही पलीकडे जाऊन या मुद्द्यावर असे स्पष्ट आश्वासन दिले आहे की, समजा आज शेतीमालाचे भाव वाढले की मजुरीचे दर वाढतात असे दिसत असले तरी उद्या असे लक्षात आले की ते वाढत नाहीत, हे लेकाचे शेतकरी स्वतःला किंमती मिळाल्यानंतर खिशात घेऊन बसून रहातात तर हा काही संपूर्ण दारिद्र्यविरोधी कार्यक्रम होऊ शकात नाही हे मान्य करून शेतमजुराच्या बाजूने शेतकऱ्यांविरुद्ध आंदोलन करायला वचनबद्ध आहे. मी ही घोषणा महाराष्ट्रातील प्रत्येक गावामध्ये केली आहे. मी शेतकऱ्यांच्या बाजूने उभा राहिलो तो काही जन्माने शेतकरी होतो म्हणून नव्हे तर एक आर्थिक निरगाठ सोडविण्याची सोयीस्कर जागा म्हणून मी शेतकरी हा मुद्दा पकडला आहे. हे चुकीचे आहे असे लक्षात आले तर शेतमजुराच्या बाजूने उभा रहाण्यास मी वचनबद्ध आहे.

पुष्कळांनी शेतमजुरांच्या मजुरीच्या दराबद्दल गोष्टी केल्या. रोजगार हमी योजनेसारख्या योजनांमुळे उत्पन्नाची हमी कुणाला मिळाली हे सर्वांना माहीत आहे. मी अत्यंत विनम्रपणे सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील शेतमजुराला जास्त मजुरी

मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटनेने जर त्यांना संपाचे आवाहन केले तर सर्व शेतमजूर शेतकरी संघटनेचे ऐकतील अशी आज महाराष्ट्रात परिस्थिती आहे. आजवर त्यांच्या बाजूने बोलणारे, त्यांच्या वतीने बोलणारे, त्यांचेच म्हणवणारे म्हणून जे काही लोक आहेत त्यांच्या हाकेला कितीजण ओ देतात याची प्रत्यक्ष उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर घडली आहेत. खरे तर त्यांच्या मागे लोक जातीलच कसे? त्यांनी गेल्या वर्षी संप जाहीर केला तो किती तारखेला? तर २३ मार्चला! २३ मार्चला कोणत्या शेतावर काम चालू असते कोणास ठाऊक! शेतमजुरांनी संप करायचा म्हणजे कशावर करायचा? शेतमजुरांचा संप करायचा तर १५ जून ते ३० जून या काळात करून दाखवा म्हणावे! सगळ्या महाराष्ट्रात दुष्काळ पडेल. एका वर्षात शेतमजुरांना पाहिजे ते दर मिळवून देता येतील.

पण, हे न करताही शेतीमालाला रास्त भाव दिल्याने मजुरीचे दर वाढतात असा अनुभव आहे. एवढेच नव्हे तर शेतकऱ्याची क्रयशक्ती वाढते आणि त्याच्याकडे जो जास्त पैसा येतो त्याचा उपयोग ग्रामीण भागामध्ये रोजगार तयार करणे, छोट्या प्रमाणावर उद्योगधंदे चालू करणे यांकरिता होतो. ही सुरुवात करायची आहे. मग गरिबी हटविण्यासाठी तुम्ही जी नियोजन मंडळे आणि जिल्हा नि तालुका पातळीपर्यंतच्या ज्या अनेक प्रकारच्या समित्या, अनेक प्रकारच्या यंत्रणा तयार केल्या आहेत त्यांऐवजी एक साधी गोष्ट केली तरी पुरे आहे.

ही गरिबी हटविण्यासंबंधीचा मुद्दा शेतकऱ्यांना समजावून सांगण्याकरिता मी एक उपमा देत असतो. दारिद्र्याने गांजलेला आपला देश म्हणजे एक आजारी मूल आहे. आमच्या सर्व विकासाच्या प्रचलित अर्थशास्त्रामध्ये आम्ही ज्या सगळ्या तुलना वापरल्या आहेत त्या यांत्रिक युगाशी संबंधित अश्या वापरल्या आहेत. कुठे 'पायऱ्या', कुठे 'टेक ऑफ' वगैरे! हिंदुस्थानातच नव्हे तर सगळ्या जगामध्ये बहुतेक अर्थशास्त्रज्ञांचे गणिताचे ज्ञान इंटिग्रल (Integral) आणि डिफरन्शियल (Differential) कॅल्क्युलस (Calculus) पाशी थांबते. आणि त्यामुळे, सोयीस्कर तुलना करण्याकरिता स्टॅटिक्स्, डायनॅमिक्स् इथपर्यंतच ते चालू शकते. आमचे म्हणणे असे आहे की आर्थिक विकासाची तुलना जर करायची असेल तर ती जीवशास्त्रातल्या विकासाशी झाली पाहिजे. देशाची गरिबी हटणे किंवा देशाचा विकास होणे ही गोष्ट एखादे लहान मूल जितक्या निसर्गतः वाढते तितकी सहजसिद्ध गोष्ट आहे. आम्ही विनाकारणच ती कठीण गोष्ट आहे असे म्हणतो. लहान मूल जसे हसतखेळत, आनंदाने – त्याची जी काही किमान काळजी घ्यावी लागते ती घेतली

की – वाढते, मोठे होते त्याचप्रमाणे देशसुद्धा मोठा होतो. क्लासिकल अर्थशास्त्रज्ञांनी जे मांडले आहे की, सगळ्या उत्पादक घटकांचा विकासाला उपयोग होईल त्यात काही अडचण नाही, ते अगदी बरोबर आहे. पण विकास होत नाही कारण आम्ही या मुलाचा गळा दाबून धरला आहे. देशाची परिस्थिती अशा मुलासारखी आहे. त्याला डॉक्टरसमोर आणले आहे. त्याचे डोके खूप मोठे झाले आहे, सुजले आहे. ही आहेत शहरे. ही वाढ नाही, ही सूज आहे. आणि शरीर मात्र सगळे वाळून गेले आहे. कारण – ही सोपी उपमा आहे, पुरेशी डॉक्टरी नाही – हृदयातून रक्त डोक्यात जाईल अशी व्यवस्था आहे, भरपूर जाईल अशी व्यवस्था आहे. परत येण्याचा नळीमध्ये कुठेतरी गाठ घालून ठेवलेली आहे – शेतीमाल शहरात जाण्याची व्यवस्था आहे पण त्याचा पुरेसा मोबदला परत येण्याची व्यवस्था नाही – म्हणून डोके सुजते आहे आणि शरीर बारीक रहात आहे. तुम्हाला गरिबी हटवायची आहे का? फक्त गाठ काढून टाका.

तुम्हाला काय वाटते की गरीब म्हणजे अडाणी आहेत, आळशी आहेत, ते काही करू शकत नाहीत? कुणीतरी ऑक्स्फर्ड किंवा केंब्रिजहून आलेली माणसे गरिबी कशी हटवायची हे जर सांगू लागले तरच ती हटेल? गरिबी हटविण्याकरिता काय करायला पाहिजे? आम्ही दिलेले उत्तर अगदी सोपे आहे. गरिबी हटविण्याकरिता इतर काहीही करण्याची गरज नाही, गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून तुम्ही जे प्रयत्न करीत आहात तेवढे प्रयत्न बंद करा म्हणजे गरिबी आपोआप हटणार आहे.

या दृष्टीने आमचे शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र नवे अर्थशास्त्र, विकासाचे अर्थशास्त्र आहे असे आमचे आग्रही मत आहे. आणि मग, या उजेडामध्ये, आम्ही जे वेगवेगळे शब्दप्रयोग वापरतो त्यांचा थोडा विचार करायला पाहिजे.

आता आणखी काही मुद्दे पाहू.

संघटित कामगारांशी आमची आघाडी डावपेचातील आहे का? ज्या मंडळींचे उत्पन्न तीन हजार रुपये आहे ती आणि आम्ही यांच्यात भांडणा आहे का? असल्यास, खरे आहे का खोटे आहे? हे सर्व तपासून घ्यायला हवे, समजून घ्यायला हवे. प्रत्येक माणसामाणसामध्ये भांडण आहे, घराघरामध्ये संघर्ष आहे. कोणतेही आंदोलन जेव्हा आपण उभे करतो, कोणत्या एखाद्या विषयावर आपण जेव्हा विचार करतो तेव्हा या सर्व संघर्षांतील सर्वांत महत्त्वाचा संघर्ष आज कोणता आहे हे ठरवावे लागते. 'भारत' आणि 'इंडिया' यांच्यातील संघर्ष सर्वांत महत्त्वाचा आहे

असे मी म्हटले याचा अर्थ संघटित कामगार आणि असंघटित कामगार यांच्यात संघर्ष नाही असे मला म्हणायचे आहे असा नाही. किंबहुना, भारतातही एक अतिभारत आहे; अपूर्व भारत आहे. त्यातही वेगवेगळे थर आहेत. त्यांच्यातही संघर्ष आहेत. पण हे सगळे संघर्ष एकाच वेळी सांगण्याची, हे संपूर्ण सत्य सांगण्याची जबाबदारी माझी म्हणजे आंदोलकाची तर नाहीच पण कोण्या अभ्यासकाचीसुद्धा नाही असे माझे मत आहे.

तीन हजार रुपये उत्पन्न गटामध्ये सहाशे रुपये उत्पन्न गटातील शेतकऱ्यांचेच भाऊ आहेत हे मान्य. पण, आज जो मुख्य संघर्ष आहे तो भारत आणि इंडिया यांमधील आहे. या प्रश्नावरतीच जी काय विभागणी करायची असेल ती करण्याचा माझा हेतुपुरस्सर प्रयत्न आहे. जो मनुष्य तीन हजार रुपये पगार मिळवतो असा संघटित कामगार आणि असंघटित शेतमजूर किंवा असंघटित शेतकरी या दोन भावांमधील हा वाद नाही हे मी पुन्हा सांगू इच्छितो. सगळे संघटित कामगार मिळून किती पगार मिळवतात? राष्ट्रीय उत्पनाच्या बाबतीत आकडे द्यायचे झाले आणि फक्त जो माल बाजारात जातो त्याचाच हिशोब काढला तर शेतकऱ्यांना उत्पादनखर्चापेक्षा कमी भाव दिल्यामुळे आमच्या अंदाजाप्रमाणे ८ हजार ते १२ हजार कोटी म्हणजे सरासरी १० हजार कोटी रुपये शेतकऱ्याकडून दर वर्षी लुटले जातात असे म्हणावे लागेल. हे एवढे पैसे काही संघटित क्षेत्रातल्या कामगारांना पगार म्हणून मिळत नाहीत.

म्हणजे, या शोषणाचे उद्दिष्ट भांडवलनिर्मिती हे आहे. इकडून, शेती गटातले काढून पगारदारांना देणे इतके सोपे नाही. संपूर्ण नियोजनामध्ये औद्योगिकीकरण करीत असताना जे भांडवल उभे करावे लागते त्या भांडवलाची निर्मिती फक्त शेतीत होते. आणि त्या भांडवलाच्या उभारणीकरिता शेतकऱ्याचे हेतुपुरस्सर शोषण होते. रशियामध्ये प्रथम नियोजनाची पद्धती सुरू झाली आणि त्याच प्रकारची पद्धती आमच्याकडे आली. पण गंमत अशी की, रशियात जेव्हा नियोजन पद्धती सुरू झाली त्या वेळी प्रियाब्रेझेन्स्की आणि बुखारीन यांनी जी विचारसरणी मांडली, जी नंतर स्टॅलिनने पुढे नेली त्याच्यात शेतीमालाच्या भावाची पातळी काय असावी यावर सर्वप्रथम विचार झालेला आहे. मला गंमत वाटते की, आमच्या देशातील नियोजनासंबंधीच्या सगळ्या लिखाणामध्ये, पाचसहा ठिकाणी गाफीलपणे झालेले उल्लेख सोडता, शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावर चर्चाच झाली नाही. या प्रश्नाची चर्चा न होता नियोजन झालेच कसे हे मला समजत नाही.

अर्थशास्त्रज्ञांवर माझा मुळीच राग नाही. मी गेल्या वर्षी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत असे म्हटले होते की, आपल्या देशातील अर्थशास्त्रज्ञांनी चुकीचे अर्थशास्त्र मांडले; पण, कृपा करून कुणी असे समजू नये की त्यांनी चुकीचे अर्थशास्त्र मांडले म्हणून आमचे नियोजन चुकीचे झाले. अजिबात नाही. नियोजन कोणत्या पद्धतीने चालायचे? इंग्रज गेल्यानंतर, इंग्रजांकडे जो भांडवलाचा पूर वहात होता तो आपल्या खिशात कसा वळवून घ्यायचा यासंबंधीच्या योजना पार पक्क्या तयार होत्या. सुखात्म्यांनी नाही मानले तर त्यांच्या ऐवजी एखादा महालनोबीस नेहमीच मिळतो. जे काही करायचे ठरविले होते त्याचे समर्थन करणारे भाट पैशाला पासरी कोणत्याही देशात मिळतात. स्वातंत्र्यानंतर देशात राबवल्या गेलेल्या नियोजनकेंद्रित अर्थव्यवस्थेतील सबंध अर्थशास्त्राची भूमिका, अर्थशास्त्राने केलेले काम एवढेच आहे. एका विचाराने कधीही आर्थिक बदल घडत नाहीत. आर्थिक बदल घडायचे असतील तर त्यांना पूरक असे तत्त्वज्ञान मांडणारे अर्थशास्त्रज्ञ तयारच असतात. सबंध मानवजातीच्या इतिहासात अर्थशास्त्राची एवढीच भूमिका राहिली आहे. शेतीपासून पुढे जाताना भांडवल उभारणी कशी करायची हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे.

शेतकरी किंवा शेतमजूर विरुद्ध संघटित कामगार यांच्यातील वाद इतका हा मुद्दा मर्यादित नाही. हा प्रश्न भांडवलउभारणीचा आहे आणि तो सोडविताना तीन हजारवाल्यांनासुद्धा जवळ घेऊन आम्ही सहाशेवाले लढायला तयार आहोत. कारण आमचा लढा ५० ते ५०० कोटीवाल्यांविरुद्ध आहे. तुम्ही तीन हजारवाले आणि सहाशेवाले यांच्यामध्ये भांडणा लावू शकता. पण मग त्या भांडणाने ५० ते ५०० कोटीवालेच खूश होतील. या जाणिवेनेच शेतकरी संघटनेने 'भारत आणि इंडिया' ही संघर्षाची रेषा आखली आहे.

हेतुपुरस्सर भाव दाबण्याइतकी शासनाची ताकद नाही हे अगदी बरोबर आहे. जसे अर्थशास्त्रज्ञ काय करायचे हे ठरवत नाही तसेच शासनसुद्धा अर्थनीती कशी चालवावी याबद्दल खरे काहीही ठरवत नाही. पंतप्रधानच नव्हे तर कोणतेही शासन हे या दृष्टीने बैलगाडीखाली चालणाऱ्या कुत्र्याप्रमाणे असते. त्या कुत्र्याला वाटते की आपणच बैलगाडी चालवत आहोत. काहीतरी चांगले झाले – उदाहरणार्थ भाव खाली आले समजा, कारण अशी निवेदने मुख्यतः शहरी लोकांना उद्देशून केली जातात – तर इंदिराबाई म्हणतात, आम्ही काय मिळवले बघा! आम्ही भाव खाली आणले. आणि भाव जर वर गेले तर म्हणतात, मागे ते जनता सरकार होते ना

त्याच्यामुळे हे सगळे झाले. शासन इतकेच करू शकते. कारण, भाव खाली येणे, वर जाणे यांचा एवढेच नव्हे तर अर्थकारणाच्या, अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही घटकाचा आणि शासनाच्या नियमांचा व शासनाच्या व्यवस्थेचा काहीही संबंध राहिलेला नाही. पंतप्रधान ज्या आज तिथे या व्यवस्थेत बसलेल्या आहेत त्या या अटीवर की भांडवलनिर्मितीची आणि भाडवलसंचयाची ही प्रक्रिया याच तऱ्हने चालू दिली जाईल!

दुसऱ्या महायुद्धानंतर तिसऱ्या जगातील वेगवेगळ्या देशांमधील लोकशाही पद्धती मोडल्या गेल्या त्याचे मुख्य कारण हे की, कच्च्या मालाचे शोषण जोपर्यंत लोकशाहीचा मुखवटा ठेवून करता येते तोपर्यंतच लोकशाहीचा मुखवटा ठेवला जातो. आणि ज्या दिवशी असे लक्षात येते की आता हा इंग्रजांचा जुना वसाहतवादाचा वारसा लोकशाहीचा मुखवटा ठेवून टिकवता येणार नाही त्या दिवशी तिसऱ्या जगातील या देशांनी लोकशाहीचा मुखवटा टाकून दिला आहे. आपल्याही देशात हे होणार आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेत शासनाचा काहीही भाग नाही. ही तर केवळ कळसूत्री बाहुली आहेत. आम्हाला रेडिओ, टेलिव्हिजनवर इंदिराबाईंची भाषणे पुष्कळ वेळा ऐकायला मिळतात म्हणून असे वाटते की त्या सर्वसामर्थ्यशाली आहेत. शासन केवळ कळसूत्री बाहुले आहे. शासनाच्या अंगी काही ताकद नाही पण शासनाचे जे बोलविते आणि करविते धनी आहेत त्यांची ताकद निश्चित आहे असे आम्ही सांगतो.

पण, शतकानुशतकांच्या आसमानी आणि सुलतानीमुळे शेतकऱ्याची परिस्थिती अत्यंत बिकट होते. शेतमालाची प्रचंड आयात, सक्तीची वसुली, निर्यातबंदी, रुपयाचे अतिमूल्यन ही हत्यारे अगदी किरकोळ वाटली तरी शेतमालाचे भाव पाडण्यासाठी प्रभावी ठरतात आणि प्रत्यक्षात ठरली आहेत.

व्यापारी आणि दलाल यांच्यामुळे शेतकऱ्यांचे शोषण होते हाही विचार आम्हाला मान्य नाही. शेतकऱ्याच्या कांद्याला जेव्हा किलोला १४ पैसे मिळत होते तेव्हा पुण्यातील डेक्कन जिमखान्याला तोच कांदा किलोला १ रुपया २० पैसे या भावाने विकला जात होता. हे जर कुणी सांगायला गेले तर मग लगेच म्हणतात, हे सगळे व्यापाऱ्यांनी केले. त्याना काढा. त्यांच्या जागी कोणाला नेमता? मार्केटिंग फेडरेशन नेमा नाहीतर एखादे खाते काढा. सरकारी अधिकारी, सहकारी अधिकारी कुणालातरी नेमा. मग हा फरक दूर झाला की ग्राहकालाही वस्तू स्वस्त मिळेल आणि

शेतकऱ्यालाही चांगली किंमत मिळेल. प्रत्यक्षात असे होत नाही; प्रत्यक्षामध्ये व्यापाऱ्याच्या फायद्याऐवजी सहकारातील आणि सरकारातील भ्रष्टाचार येतो. ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत आणि शेतकऱ्याला मिळणारा भाव या दोघांमधील तफावत तीच रहाते. शेतकऱ्याला मिळणारी किंमत आणि ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत यांच्यातील हा फरक का आहे हे समजावून घेणे आवश्यक आहे, अत्यंत महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्याला ती किंमत मिळते जी भारतातल्या परिस्थितीमध्ये त्याला कमीत कमी देऊन चालेल आणि ग्राहकाला ती किंमत द्यावी लागते जी इंडियातील परिस्थितीमध्ये त्याच्याकडून जास्तीत जास्त काढून घेता येईल. भारतामध्ये, जिथे पाच पैशाचे नाणे पडले तर म्हातारी अजूनही खाली बसते आणि धूळ सावडून नाणे सापडल्याखेरीज पुढे जात नाही तिथे कोणती कमीत कमी किंमत दिली तरी चालेल ती शेतकऱ्याला मिळते. आणि, ज्या भागामध्ये चित्रपटगृहांत पहिल्यांदा बाल्कनी भरतात, मग ड्रेसिंग सर्कल आणि मग पुढच्या खुर्च्या किंवा जिथे एखाद्या संध्याकाळी पाचदहा रुपये सहज खर्च झाले तर काही जास्त झाले असे वाटत नाही त्या भागामध्ये ग्राहकाकडून जास्तीत जास्त जी काय किंमत काढून घेता येईल ती त्याच्याकडून काढून घेतली जाते. जेव्हा डेक्कन जिमखान्याला १ रुपया २० पैसे किलोने कांदा विकला जात होता तेव्हा मी सहज चौकशीला गेलो होतो. कॅफे डिलाईटजवळ एक लहान मुलगा अजूनही बसतो कांदे विकीत.

त्या वेळी त्याला मी विचारले, 'तू कांदा केवढ्याला आणलास?'

तो म्हणाला, 'फुले मंडईतून मी ४० पैसे किलोने आणला.'

'मग, तू १ रुपया २० पैसे किलोने का विकतो?' मी विचारले.

यावर तो म्हणाला, 'इथे आलेली माणसे कांद्याला १ रुपया २० पैसे मागितले तर घासाघीस करीत नाहीत, देऊन टाकतात.'

या मुलाला बाजारपेठेचे अर्थशास्त्र जितके समजले तितके आमच्या सगळ्या नियोजन समितीला समजलेले नाही. समजा, मी ८ रुपयांना भुईमूग घेतला, ४ रुपये खर्च करून तो स्वित्झर्लंडला पाठवला तर तो स्वित्झर्लंडमध्ये १२ रुपयांनी विकला जात नाही, तो विकला जातो ५२ रुपयांनी! कारण, हिंदुस्थानातील आर्थिक परिस्थिती आणि स्वित्झर्लंडमधील आर्थिक परिस्थिती अगदी भिन्न आहेत. तसेच, भारतामधून म्हणजे ६०० रुपये मिळकतीच्या भागामधून आपण इंडियामध्ये म्हणजे ३००० रुपये मिळकतीच्या भागामध्ये जेव्हा वस्तू पाठवतो तेव्हा उत्पादकाची किंमत,

अधिक खर्च, अधिक वाहतूक खर्च, अधिक (उत्पादकाचा) फायदा बरोबर ग्राहकाची किंमत हे समीकरण अस्तित्वातच असत नाही. प्रत्यक्षात, उत्पादकाची घेण्याची ताकद आणि ग्राहकाची खरीदण्याची ताकद यावरच सारे बेतले जाते.

म्हणूनच व्यापाऱ्याला हलवा असे मी मागत नाही. हलवायचे असेल तर जरूर हलवा पण आज सहकारी चळवळीविषयी, सहकारी संस्थांविषयी गैरवाजवी अपेक्षा ठेवू नका. शेतमालाच्या भावाची कायमची हमी आम्ही मागितलेली नाही. पण शेतीमालाचे रास्त भाव जेव्हा मिळतील तेव्हा त्या परिस्थितीमध्ये शेतकरी स्वतः सहकारी संस्था काढतील – सरकारी सहकाराच्या नव्हे तर, खऱ्याखुऱ्या सहकाराच्या – आणि त्यामधूनच साठवणुकीची व्यवस्था करतील, प्रक्रियेची व्यवस्था करतील. पण हे सर्व ते केव्हा करतील? जेव्हा त्याला श्वास घ्यायला फुरसत होईल तेव्हाच! शेतकऱ्यांची सहकारी चळवळ तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा शेतीमालाला किमान भाव मिळू नयेत असे जे शासनाचे प्रयत्न आहेत ते बंद होतील. तोपर्यंत सहकारी चळवळ ही यशस्वी होणे सुतराम शक्य नाही. सहकारी चळवळीवर माझा विश्वास आहे; पण आज तुम्ही सहकारी चळवळ यशस्वी व्हायला वावच देत नाही. ती जर खऱ्या अर्थाने यशस्वी व्हायला हवी असेल तर त्याकरिता पहिली अट म्हणजे शेतीमालाला भाव मिळू नये हे चालवलेले धोरण बंद झाले पाहिजे.

'सहकार नको, सरकार नको मग यंत्रणा कोणती हवी?' असा प्रश्न दांडेकरांनी विचारला आहे. खरे सांगायचे तर अमुक एक यंत्रणा हवी असा विचार मी मांडलेलाच नाही. पण शासनाने शेतीमालाच्या भावाची कायमची हमी द्यावी, त्याकरिता एक खाते काढावे, दर वर्षी आम्ही काहीतरी माल काढावा आणि तो सरकारने सगळा विकत घ्यावा असली अजागळ योजना माझ्या मनात अजिबात नाही. कारण, अशा तऱ्हेच्या शासकीय हस्तक्षेपावर माझा विश्वास नाही. शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळत नाही म्हणून तो थांबू शकत नाही आणि तो थांबू शकत नाही म्हणून त्याला भाव मिळत नाही अशा सुलतानी संकटांचे तयार झालेले हे दुष्टचक्र आहे. हे कुठेतरी तोडायचे आहे आणि त्याचसाठी काही काळापर्यंततरी भावाची हमी हवी आहे. फिक्की (FICCI)च्या अध्यक्षा शरयू दफ्तरी यांनी फार चांगल्या वाक्यामध्ये आणि अत्यंत प्रामाणिकपणे शेतकऱ्यांच्या परिस्थितीबद्दल विचार मांडला आहे की, आमची आजची आर्थिक व्यवस्था आणि व्यापारी व्यवस्था ही शेतकरी गरजू रहाण्यावर अवलंबून आहे. काय भयानक सत्य आहे पहा! त्या पुढे म्हणतात, जर का पीक तयार झाल्याबरोबर शेतकरी बाजाराकडे

धावला नाही तर आमची सगळी व्यवस्था कोलमडून पडणार आहे. आणि आमची ही सगळी आंदोलने – लोकांना जी थोडी पोरकट वाटतात, पोरखेळासारखी वाटतात, ज्याबद्दल बोलताना लोक म्हणातात की, आम्ही चांगल्या संस्था काढतो, सहकारी कारखाने तयार करतो त्यांचा लाभ घेण्याऐवजी लोक काय येऊन बसतात वीसवीस दिवस रस्त्यावर? – त्यांचा उद्देश एकच आहे. तो म्हणजे ज्या ज्या पद्धतीने थोड्याफार प्रमाणात का होईना पैसा शेतकऱ्याच्या खिशात नेऊन त्याला देता येईल तितकी आर्थिक ताकद आम्हाला द्यायची आहे ते त्यांना नको आहे.

आणि मग वाटाघाटी नाहीत, पीक लागवड कुणी किती वाटून घ्यायची हाही प्रश्न नाही. आम्ही सांगू त्या किंमतीखाली आपला माल विकणार नाही अश्या तऱ्हेची व्यवस्था आम्हाला तयार करायची आहे. पण ते जेव्हा शेतकऱ्याच्या अंगी थांबण्याची ताकद येईल, वाढेल तेव्हाच शक्य आहे. आज संध्याकाळी भाकरी कुठून येणार आहे, मुलीचे लग्न करायचे आहे त्यासाठी पैशाची गरज आहे, आज कर्ज फेडले नाही तर बँकेची जीप उद्या भांडी उचलायला येणार आहे अश्या विवंचनांनी भरलेल्या परिस्थितीमध्ये शेतकरी थांबू शकत नाही. त्याची ताकद वाढविण्यासाठी शेकडो वर्षे आजारी असलेल्या मुलाला आम्ही सलाईन लावतो आहोत. त्याच्या पुढचे ऑपरेशन पुढे व्हायचे आहे.

ऑपरेशन कसे असावे हा मुद्दा डॉ. दांडेकरांनी बराच वेळ घेऊन मांडला आणि मला त्याच्याबद्दलच तुम्हाला (शेतकऱ्यांना) मुद्दाम सांगावयाचे आहे. कालही वसंतदादांशी बोलताना या विषयी चर्चा झाली. एखाद्या शेतीमालाला रास्त भाव मिळाला तर त्याचे उत्पादन वाढते. कांद्याला भाव मिळाला तर कांद्याचे उत्पादन दुप्पट झाले. उसाला किंमत मिळाली – त्याचा थोडा संबंध म्हटला तर आहे, म्हटला तर नाही – पण हिंदुस्थान हा देश ऊस उत्पादनाच्या बाबतीत एक नंबरचा झाला. एक गोष्ट यामधून निश्चित सिद्ध झाली की शेतकरी किंमतीच्या प्रोत्साहनेला (Incentive) प्रतिसाद देतो. उत्पादनवाढीला एवढेच एक कारण आहे असे मला म्हणायचे नाही. त्याची काही वेगळी चक्रे असतील. पण किंमत हा त्यातील एक घटक निश्चित आहे. किंमत वाढली तर शेतकरी उत्पादन वाढवून दाखवतो याबद्दल काही वाद नाही. पण म्हणून जर कुणी म्हणू लागले की कांद्याचे उत्पादन फार झाले, साखरेचे उत्पादन फार झाले तर मी ते मान्य करायला तयार होणार नाही.

दूध फार झाले हो! हे लोकांनी घेतले नाही तर तुम्ही काय करणार ही चिंता आम्हाला केव्हा पडते? आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेचे दूध पिणे हे

सरासरीने तीन चमचेसुद्धा नसताना अशी चिंता पडण्याचे कारणच काय? ज्यांनी आयुष्यात साखर खाल्ली नाही अशी मंडळी अजून आमच्याकडे २५ ते ३० टक्के आहेत. आणि आतापासूनच आम्हाला साखरेचे अतिउत्पादन झाले तर काय होईल याची चिंता पडली आहे!

साखरेचे उत्पादन वाढले तर त्या उत्पादनातून मिळकतीचे जे स्रोत तयार होतात ते स्रोत आजच्या व्यवस्थेत त्यांच्या हाती जातात की ज्यांना आधीच मधुमेह झाला आहे. ते कसली साखर जास्त खातात? ज्यांनी आयुष्यात कधी साखर खाल्लेली नाही, ज्यांना त्याची त्रुटी आहे त्यांच्या हाती जर ही नवी क्रयशक्ती दिली तर तुम्हाला आजच काय आणखी दहा वर्षे अतिउत्पादनाचा प्रश्न कुठेही येणार नाही.

अंतुल्यांबरोबर काय बोलणी झाली याबद्दल दांडेकरांनी थोडे कुतूहल दाखवले म्हणून मी आणखी एक माहिती सांगतो. आम्ही कांद्याचे आंदोलन केले याचे कारण असे की महाराष्ट्रात देशाच्या एकूण उत्पादनापैकी ६५ ते ७० टक्के कांदा पिकत होता. त्यातला निम्मा कांदा पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतल्या चारपाच तालुक्यांतच पिकत होता. म्हणजे केवळ दीडदोन जिल्ह्यांमध्ये आंदोलन उभे करून कांद्याच्या बाजारपेठेवर एक तऱ्हेचा कब्जा घेणे शक्य होते. म्हणून आम्ही कांद्याचे आंदोलन केले. कारण शेवटी या आंदोलनाचे स्वरूप आर्थिक आहे. पुढे आम्ही उसाचे आंदोलन केले ते याच कारणाने की महाराष्ट्रामध्ये देशातल्या साखरउत्पादनापैकी ४० टक्के उत्पादन होते. म्हणून आम्ही साखर निवडली आंदोलनासाठी. एरवी माझे स्वतःचे साखरेचेही उत्पादन नाही आणि कांद्याचेही त्या वेळी नव्हते. पण आम्ही पिके बाजारपेठेचा अभ्यास करून निवडली. ज्यांच्या बाजारपेठेवर कमीत कमी ताकदीने जास्तीत जास्त दबाव आणता येईल ती पिके निवडली. पण सरकारने बाजारभाव देताना फक्त कांद्याला भाव दिला ही महाचूक झाली. आम्ही अंतुल्यांना सांगितले होते की, आंदोलन कांद्याचेच आहे म्हणून तुम्ही फक्त कांद्याची खरेदी करायला जाल तर मराल; तुम्ही कांद्याला भाव देताना किमान हरभरा, भुईमूग, मिरची, ज्वारी या चार पदार्थांनातरी भाव द्यायलाच पाहिजे. पण, त्यांनी फक्त कांद्याला भाव देऊन त्याची खरेदी केली.

भुईमुगाबद्दल मी अंतुल्यांना सांगितले होते की, 'तुम्ही भुईमुगाला फक्त ४०० रुपये क्विंटल असा हमीचा भाव जाहीर करा. तुम्हाला बहुतेक त्याची खरेदीही करावी जागणार नाही.' ते म्हणाले, 'भुईमुगाला क्विंटलला ४०० रुपये दिले तर ग्राहकाला गोडेतेल काय भावाने मिळेल?' तेव्हा आम्ही सांगितले की,तेलाचा भाव किलोला

साडे दहा रुपये पडेल. त्या वेळी बाजारात गोडेतेलाचा भाव किलोला सोळा रुपये चालू होता. त्या वेळचे कृषिमंत्री भगवंतराव गायकवाड, त्यांना आपले शहाणपण दाखविण्याची इच्छा होती, म्हणाले, नाही नाही, साडेदहा नाही, दहा रुपयांतच देता येईल. आम्ही म्हटले, उत्तम आहे. भुईमुगाचे ४०० रुपये क्विंटलमागे शेतकऱ्याला मिळाले आणि ग्राहकाला तेल १० रुपये किलोने मिळाले तर वादाचा मुद्दा येतोच कुठे?

पण सरकारने आम्हाला ४०० रुपये दिले नाहीत. आम्ही त्यांना आश्वासन दिले होते की, ४०० रुपये दिलेत तर तुम्हाला आम्ही महाराष्ट्रात भुईमुगाचे डोंगर उभे करून देतो. शेतकऱ्याला भाव मिळाला २६७ रुपये दर क्विंटलला – कृषिमूल्य आयोगाने ठरविलेला. आणि ग्राहकाला तेल कसे मिळाले? मुंबईतील व्यापाऱ्यांशी शासनाने करार केला की, तुम्ही १५ रुपयांच्या वर तेल विकू नका. व्यापाऱ्यांनी सही केली आणि तेलाचा भाव १८ रुपये किलो केला. शेतकरी आणि ग्राहक यांना लुटण्याचे पद्धतशीर धोरण राबविले जाते असे आम्ही म्हटले तर वादाचा प्रश्नच कुठे निर्माण होतो?

पिकांचे जर नियोजन करायचे असेल आणि जर का कुण्या शहाण्याची कल्पना असेल की माझ्या आंबेठाण गावामध्ये जाऊन सांगू शकेल की बाबा तू एकाच एकरात ज्वारी लाव, तू या एकरात भुईमूग लाव तर ते केवळ अशक्य आहे. ज्याने शेतीची जमीन कागदापलीकडे जाऊन पाहिलेली आहे त्याच्या लक्षात येईल की अश्या तऱ्हेचे नियोजन अशक्य आहे. पण तुम्हाला नियोजन करायला सांगितले कुणी? तुम्ही सगळ्या वस्तूंना भाव देण्याऐवजी, सगळ्या वस्तूंना संतुलित किंमती देण्याऐवजी जिथे आम्ही रेटतो तिथेच म्हणजे फक्त कांद्याला आणि उसाला भाव देता म्हणून अतिउत्पादन तयार होते. पीकनियोजन अवश्य करा, पण ते करण्यासाठी सगळ्यात सोपा मार्ग वापरा. सगळ्या वस्तूंना संतुलित किंमती दिल्यानंतर शेतकरी काय पीकनियोजन करतो याचा जरा अनुभवतरी घ्या! माझी खात्री आहे की नियोजन भवनात पीकनियोजन जितक्या चांगल्या तऱ्हेने होईल त्याच्यापेक्षा अनेक पटींनी चांगले नियोजन हा शेतकरी करून दाखवेल.

उत्पादनखर्च पाहिजे तितका काढता येतो हे अगदी खरे आहे आणि मी हे उघडपणे म्हणतो आहे. उसाचा भाव जेव्हा आम्ही ३०० रुपये मागितला तेव्हा अनेकांनी टीका केली. लोक म्हणाले, तीनशे रुपये? कारखान्याची यंत्रे विकावी लागतील उसाला तीनशे रुपयांचा भाव दिला तर. हीच मंडळी नंतर दिंडी घेऊन

निघाली! वसंतदादा पाटलांनी कालच सांगितले की, आता महाराष्ट्राच्या कृषिमूल्य आयोगाने जो हिशोब केला आहे त्याप्रमाणे ८१/८२ साली उसाचा उत्पादनखर्च ३११ रुपये होता. आम्ही त्या वेळी ३०० रुपये मागताना म्हटले होते की, आम्ही ३०० रुपयेच का मागतो आहोत? कारण आम्ही शेतमजुराची मजुरी – श्रममूल्य म्हणून फक्त सात रुपये धरले आहेत. सातच का? कारण आज मला दोन लाखच माणसे रस्त्यावर आणता येतात. दहा लाख शेतकरी ज्या वेळी मला रस्त्यावर आणता येतील त्या वेळी मी शेतमजुराच्या मजुरीचा दर १५ रुपये धरीन आणि त्याप्रमाणे भाव मागीन. अवश्य मागीन. बहुतेक त्या वेळी रस्त्यावर यावेच लागणार नाही.

तेव्हा, उत्पादनखर्च ही कल्पना तशी ताणण्यासारखी – म्हटले तर मोठी करण्यासारखी, म्हटले तर बारीक करण्यासारखी आहे. मी एका ठिकाणी म्हटले आहे की, भातउत्पादक शेतकऱ्याला एक बैल पोसावयाचा आहे असे धरले तर त्याला ३५० रुपये क्विंटलखाली भाताचे उत्पादन करणे अशक्य आहे. पण मग, बैल कुणाकडूनतरी भाड्याने आणला असे धरले तर चालू शकते. अश्या वेळी बैलाचा वार्षिक खर्च हा बैलमालकावर पडतो. आणि मग, भाताच्या उत्पादनखर्चाचा आकडा २५० रुपयांपर्यंत येऊन तशी मागणी करायची.

पण उत्पादनखर्च हा शब्द जो मी वापरतो त्याच्या अर्थाच्या मर्यादा, जर आपण या शब्दाचा भांडवलनिर्मितीच्या प्रश्नाशी संबंध आहे हे लक्षात घेतले तर, लक्षात येतात. उत्पादनखर्चाच्या (Costingच्या) कोणत्याही पुस्तकात आपल्याला सापडेल की, जेव्हा उत्पादनखर्च भरून येत नाही तेव्हा त्याचे काय परिणाम होतात. त्याचे चार परिणाम दिलेले असतात.

(१) संबंधित उत्पादक हा भांडवल खाऊन जगतो.
(२) तो कमी खाऊ लागतो, त्याच्या गरजा कमी करतो.
(३) ताकदीच्या पलीकडे श्रम/कष्ट करतो. आणि शेवटी,
(४) धंदा बंद करतो.

उत्पादनासाठी खर्च केल्यामुळे शेतीमध्ये जे भांडवल खाल्ले जाते त्या भांडवल खाण्याचा दुसरा परिणाम म्हणजे औद्योगिकीकरणाकरिता होणारी भांडवलनिर्मिती थांबते हा आहे. हा विचार ठासून मांडण्यासाठी आम्ही उत्पादनखर्चाचा मुद्दा वापरतो.

उत्पादनखर्च म्हणजे काय याची मला माहिती आहे ना! कोणत्याही फॅक्टरीत जा. समजा, इथे भोसरीला एक दहा लाखांचा कारखाना आहे. तिथला छोटा मालक

एक छानपैकी प्लायवुडने बांधलेली केबिन, त्यात एअरकंडिशनर आणि खाली गालिचा अशा रुबाबात बसतो. दहा एकर बागायती शेती असलेल्या माणसाने आपल्या उत्पादनखर्चामध्ये अशी एखादी खोली धरली तर काय बिघडले हो? काहीच बिघडणार नाही. काय धरायला हरकत आहे; कारखानदार त्याच्या उत्पादनखर्चामध्ये त्याचे गालिचे धरतोच ना!

काही वेळा आम्हाला लोक म्हणतात की, शेतकऱ्याच्या हातात पैसा मिळाला की तो दारूत उडवणार. त्यावर माझे उत्तर एकच आहे. बाबानो, तो पिईना का दारू? तुम्ही कलेक्टरला पगार जेव्हा देता तेव्हा त्याच्याकडून काही लिहून घेत नाही की, 'बाबा, मी या पैशातून दारू पिणार नाही.' तरी पगार देता! मग शेतीमालाला भाव देताना तुम्ही ही अट कशाला घालता? आम्ही अजूनपर्यंत उत्पादनखर्चामध्ये दारूचा खर्च घालायला सुरुवात केलेली नाही. पण, किर्लोस्कर कंपनीचे जे इंजिन आम्ही विकत घेतो ते विकता यावे म्हणून पंचतारांकित हॉटेलांमधून ज्या दारूच्या पार्ट्या होतात त्या दारूचा खर्च शेतकऱ्याला त्या इंजिनाच्या किंमतीतून आजही द्यावा लागतो. इतकी उत्पादनखर्चाची कल्पना मोठी आहे. पण आम्ही हा शब्द वापरतो तो जास्त व्यापक अशा अर्थशास्त्राच्या – ज्याचा संबंध भांडवलनिर्मितीशी आहे अशा – पायावर मुद्दाम वापरतो. तो उत्पादनखर्च काढण्यासाठी कृत्रिम नमुना पद्धतीचा आम्ही आग्रह धरतो तो याचसाठी. देशातील एकूण परिस्थिती, शेतीची परिस्थिती लक्षात घेता एक नमुन्याची तांत्रिक पातळी गृहीत धरावी लागेल; ही पातळी वेळोवेळी वाढवावी लागेल आणि निदान नमुना पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्याचा खर्च भरून निघेल असे नियोजन करावे लागेल.

सरकारने भावाची हमी देणे आणि सगळे नुकसान सोसणे हे शक्य नाही; हे अव्यवहार्य आहे. या पुस्तकांत याबद्दल मी पुष्कळ बोललो आहे. मग, आम्हाला काय पाहिजे आहे? थोडक्यात सांगायचे तर, आमची रणनीती अशी आहे की, हरभरा, भुईमूग, मिरची, ज्वारी; कांदा, कपाशी, ऊस, तंबाखू; दूध आणि भात या वस्तूंना भाव मिळावायचे. ही यादी आम्ही अभ्यासपूर्वक तयार केली आहे. एवढ्या वस्तूंपैकी सहा वस्तूंनातरी तीन वर्षे सलग रास्त भाव जर मिळाले तर चौथ्या वर्षी शेतकऱ्याला कुणाकडेही भाव द्या म्हणून मागायला जायची गरज उरणार नाही. तुम्हाला, बा शेतकऱ्या, आम्हाला ज्वारी दे असे म्हणत त्याच्या दाराशी जावे लागेल. इतकी थांबायची ताकद याच्यातून निर्माण होते. विनाकारण एक मोठी यंत्रणा तयार करायची आणि कायमचे शेतकऱ्याकडून घेत रहायचे आणि मग पुढे विकत

रहायचे अशी आमची कल्पना नाही.

दांडेकरांनी म्हटले की, १ रुपयाला कांदा घेतला आणि ८० पैशाला विकला तर काळाबाजार होतो. अगदी खरे आहे. कारण तोच कांदा परत येतो. हे नाफेडच्या कांदाखरेदीत झाले आहे. एवढेच नाही तर तो कांदा खरेदी करायचा आणि मुंबईला न्यायचा, मुंबईला पुन्हा ट्रकमध्ये भरून पुन्हा चाकणच्या बाजारात आणायचा असे प्रकार सुरुवातीला झाले. पण नंतर त्यांना वाटले की ही यातायात हवी कशाला? कांदा इथे ट्रकमध्ये भरायचा, तिथे मुंबईत ओतायचा, पुन्हा ट्रकमध्ये भरायचा, पुन्हा इथे आणायचा, ओतायचा आणि पुन्हा भरायचा! त्यापेक्षा एकाच ठिकाणी ढीग ठेवायचा आणि २८-३ रोजी पहिली खरेदी, ३०-३ रोजी पहिली विक्री, मग ५-४ रोजी दुसरी खरेदी अश्या नुसत्या कागदावरच खरेद्या-विक्र्या होऊ लागल्या. यामुळे महाराष्ट्र शासनाला २१ कोटीच्या खरेदीमध्ये १७ कोटीचा तोटा दाखवावा लागला. पण भ्रष्टाचार हा केवळ किंमती पडत असतानाच होतो असे नाही. म्हणजे १ रुपयाला घेतलेला कांदा ८० पैशांला विकावा लागला तरच भ्रष्टाचार होतो असे नाही. गेल्या वर्षी ६० पैशांनी घेतलेला कांदा बाजारात कांद्याचा भाव १ रुपया चालू असताना महाराष्ट्र राज्य फेडरेशनच्या म्हणजे सहकारी अधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांना ४५ पैशांनी विकला आणि ट्रकमागे त्यांच्याकडून पैसे खाल्लेत.

भारत आणि इंडिया यांच्यातील व्यवहार इतका विषम आहे की, या व्यापाराशी ज्याचा ज्याचा संबंध येतो तो तो आपले खिसे भरायला बघतो. बिरबल जसा समुद्राच्या लाटांपाशी बसूनसुद्धा आपला फायदा काढू शकत होता तसा हा व्यवहार आहे. त्यामुळे, वेगळी यंत्रणा तयार करण्याऐवजी शेतीमालाला भाव मिळणार नाही असे जे धोरण आहे, असे जे तुमचे प्रयत्न आहेत ते सर्व तुम्ही थांबवा एवढेच आमचे म्हणणे आहे.

शेतीमालावर प्रक्रिया होणे आवश्यक आहे; बिल्कूल आवश्यक आहे. मी स्वतः म्हटले आहे की, संघटना व्हायला हवी, साठवणुकीची व्यवस्था व्हायला हवी, प्रक्रिया व्हायला हवी. पण नुसती प्रक्रिया केली तर काय होते? साखर कारखान्यांचे जे झाले ते होते. आज उसाचा उत्पादनखर्च टनाला ३०० रुपये आहे असे स्वतः वसंतदादा कबूल करतात आणि उसाला फक्त १५० रुपये ते १७० रुपये मिळतील; माफ करा, आम्ही काहीही करू शकात नाही असेही तेच म्हणतात. कारण इतक्या कमी भावाने ऊस घेऊनही साखरेचा उत्पादनखर्च सरकारी आकडेवारीनुसार किलोला ४ रुपये ९० पैसे असूनसुद्धा साखरेची लेव्हीची किंमत सरकारने किलोला

२ रुपये ८३ पैसे ठरविली आहे. ६५ टक्के साखर सरकार २ रुपये ८३ पैसे भावाने घेऊन जाते. आम्ही असा प्रश्न विचारतो की, साखर ही जीवनावश्यक वस्तू आहे म्हणून तुम्ही साखरेवर लेव्ही लावता, मग औषधे काय जीवनावश्यक नाहीत? तुम्ही औषधांवर लेव्ही का लावत नाही? ज्याच्यावाचून माणसे मरतात ती औषधे तुम्हाला जीवनावश्यक वाटत नाहीत पण ज्या साखरेशिवाय २५ ते ३० टक्के माणसे न मरता जगू शकतात ती साखर तुम्हाला जीवनावश्यक वाटते, हे कसे?

दारिद्र्याच्या प्रश्नावर रोजगार हमीसारखी योजना हा एक उपाय आहे असे कुणाला वाटले तर ठीक आहे. तुम्हाला जर रोजगार हमी योजना हवी असेल तर तुम्ही अवश्य चालू करा/ठेवा. पण मी शेतकऱ्यांना शेतकरी संघटनेच्या वतीने संदेश देतो तो असा आहे की, ही रोजगार हमी योजना आणि या तऱ्हेच्या सर्व योजना या सगळ्या वेगवेगळ्या तऱ्हेच्या भिकेच्या योजना आहेत – वेगवेगळ्या लाचारीच्या योजना आहेत. शेतीमालाला रास्त भाव मिळाल्यास आवश्यक ते रोजगार गावात तयार होतील; रोजगार हमीसारखे बाहेरून कुणी येऊन काही करण्याची गरज उरणार नाही.

रोजगार हमीसारख्या योजनांवर माणसे काम करण्यासाठी जात नाहीत; तिथे माणसे जातात याचे कारण म्हणजे तिथे फक्त हजेरीची मजुरी मिळते. इकडचा ढीग तिकडे टाकायचा आणि तिकडचा ढीग पुन्हा इकडे टाकायचा. त्याची दोन्ही वेळची मजुरी दाखवायची – काहीही काम न करता. शंभर माणसे जर हजेरीपटावर असतील तर पंचवीसच माणसे कामावर असतात. आणि योजनेचा फायदा मुख्यतः तिच्यासाठी तयार केलेल्या शासनयंत्रणेला. अश्या तऱ्हेने रोजगार हमी योजना चालू आहे. अश्या तऱ्हेच्या, इतक्या भानगडीच्या योजना तुम्ही करताच कशाला? शेतकऱ्याच्या शोषणाशिवाय आजवर औद्योगिकीकरण आणि विकास झाला नाही. पण, असे शोषण न करताही विकास जास्त चांगल्या तऱ्हेने होईल असे आम्ही दाखवून देत आहोत तर इतकी साधी गोष्ट करून बघायला कोणती हरकत आहे?

शेतकरी संघटनेने 'शेतीमालाला रास्त भाव मिळविणे' हा एककलमी कार्यक्रम घेतलेला आहे. काही लोकांच्या मते हा अगदी 'हलका' कार्यक्रम आहे. त्यांना वाटते, शरद जोशी फक्त कांद्याच्याच भावाबद्दल बोलतात, याला काय महत्त्व द्यायचे? हे काही फारसे महत्त्वाचे आहे असे कुणाला वाटतच नाही. ही आमच्याकडील बुद्धिमंतांची एक परंपरागत प्रवृत्ती आहे. अमुक अमुक मनुष्य चामडे शिवायचे काम करतो म्हणजे तो काही महत्त्वाचा नाही; 'आत्मा अमर आहे' वगैरे

जर कुणी म्हणत असला तर तो फार महत्त्वाचा आहे. पण, 'शेतीमालाला भाव मिळवणे' या कार्यक्रमाचेही काही महत्त्व आहे, ते समजून घ्या.

समाज जो सगळा एकत्र येतो/रहातो तो सेवा आणि वस्तुंच्या देवघेवीसाठीच येतो/रहातो. आणि आम्ही ही गोष्ट लक्षात न घेता बाकीच्या सगळ्या गोष्टींविषयी चर्चा करतो. शेतकऱ्याला पतपुरवठा व्हावा म्हणून खूप चर्चा झाल्या आहेत, खूप अहवाल तयार झाले आहेत. पण, शेतकरी त्याला दिलेले कर्ज परत फेडू शकतो किंवा नाही यावर कुणीच विचार केलेला नाही. मी या विषयावरील २६ अहवाल पाहिले आहेत. आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल की 'क्रेडिट वर्दिनेस (Credit Worthiness)' हा शब्द न वापरता शेतकऱ्याच्या पतपुरवठ्यावर हे सव्वीस अहवाल लिहिले गेले आहेत. कोणीही शेतीमध्ये, जमिनीमध्ये उभे राहून पाहिले नाही, विचार केला नाही की मी जर या शेतीवरच अवलंबून असतो तर मला हे कर्ज परत करता आले असते का नाही. अनेक वेळा जेव्हा या विषयावर मतभेद होतात तेव्हा मी सांगतो की शेतीमालाच्या प्रश्नावरची ही भूमिका ज्यांना समजत नाही त्यांनी सहाएक महिने शेतीवर पोट भरून पहावे. मी हे फार गंभीरपणे आव्हान करतो आहे. मी काही कम्युनिस्ट नाही आणि मला कॉन्सेंट्रेशन कँपही काढायचा नाही. पण हे आव्हान काही केवळ कागदी घोडे नाचवून, आकडे इकडे तिकडे करून टाळता येण्यासारखे आव्हान नाही. नियोजन समितीवर बसलेल्या मंडळींना केवळ सहा महिने फक्त शेतीवर पोट भरायला सांगितले तर उद्या त्यांचे अहवाल संपूर्णपणे वेगळे येतील याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे.

मग दांडेकर आणि मी यांच्या विचारांत फरक राहिला आहे का? शेतीमालाला भाव मिळवून कसे द्यावे याबद्दलही वाद नाही. संघटित-असंघटित यातला वाद आहे का भांडवलनिर्मितीचा प्रश्न आहे हा मुद्दा आहे. कॉलेजमध्ये ही चर्चा होत असती तर हा मुद्दा फारच मोठा आहे असे दाखविले असते.

चढत्या भावाचा फायदा गरिबांतल्या गरिबांना मिळतो का? सध्याचा पुरावा 'मिळतो' असा आहे. पण तसा मिळत नाही असे दिसले तर त्याकरिता शेतकरी संघटना लढा द्यायला तयार आहे. मग वाद राहिला कुठे?

मला पण असे वाटते की, दांडेकरांनी गेली तीसपस्तीस वर्षे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध हिंदुस्थानात गरिबीच्या प्रश्नाचे एक स्वरूप लोकांसमोर मांडले, त्याचे विवेचन केले. ज्यांनी गावोगाव जाऊन पाहिले असे शेतकऱ्यांच्या बाजूने बोलणारे दांडेकर हे गेल्या तीसपस्तीस वर्षांतील एकमेव अर्थशास्त्रज्ञ आहेत असे म्हणावे

लागेल. मी धनंजयराव गाडगीळांचा उल्लेख करत नाही कारण आज ते आपल्यात नाहीत.

त्याच्या पुढील पायरीवर जाऊन एका नवीन विश्लेषणावर काम करणारी शेतकरी संघटना उभी राहू पहाते आहे. मोठ्या प्रमाणावर ज्यांचे एकमत आहे, ज्यांच्या प्रेरणा एक आहेत अशा शेतकरी संघटना आणि दांडेकर यांच्यामध्ये, ज्याप्रमाणे शेतकऱ्यांच्यामध्ये मोठा शेतकरी, छोटा शेतकरी, शेतमजूर असे भेद उभे करून फूट पाडण्याचा प्रयत्न करतात त्याचप्रमाणे काही कांगावखोर माणसे विनाकारणच भेद पाडण्याचा प्रयत्न करतात, इतका निष्कर्ष आज काढता येतो.

■